RNI- MAHMAR2003/14666
L/130/RNP/Renewal/2021-23
SHIV VANI

# शिव वाणी

सडेतोड आणि परखड विचारांची सत्यवाणी

बीड | साप्ताहिक | मराठी | वर्ष २२ वे | अंक १२ | सोमवार दि.२४ मार्च २०२५ | Mo.9422748792/ 9822628521 | पाने : ४ | किंमत ०३ ₹

Beed (Maharashtra) | Weekly | MARATHI | Year-22 | Issue -12 | MONDAY DT.24 MARCH 2025 | RNI- MAHMAR2003/14666 | PAGES - 4 | PRICE - 3 RUPEES

## समाज माध्यमावर आक्षेहार्य पोस्ट; गुन्हा दाखल




परळी / प्रतिनिधी
औरंगजेबा संदर्भात समाज माध्यमांवर आक्षेपार्ह पोस्ट करणाऱ्या दोघांविरुद्ध परळी शहर पोलीसांनी कायदेशीर कारवाई केली असून या मध्ये एक अल्पवयीन मुलगा आढळून आला आहे. या घटनेने शहरात एकच खळबळ उडाली आहे.दोन समाजात द्वेष भावना वाढवण्याच्या उद्देशाने २ इसमांनी ज्या मध्ये एक अल्पवयीन असून त्यांनी इंस्टाग्राम या सोशल माध्यमातू दि. २२ मार्च रोजी रात्री ९ वाजण्याच्या दरम्यान औरंगजेबा संदर्भात आक्षेपार्ह पोस्ट सोशल मीडियावर व्हायरल केली. जिल्ह्याचे सायबर पोलीस सोशल मीडियावर लक्ष ठेवून असल्याने ही पोस्ट दिसून

(उर्वरीत पान २ वर)

# लाडक्या बहिणींना २१०० द्यायचे आहेत:पण मलाही हिशोब द्यावा लागतो

## पैशाचे सोंग करता येत नाही; अजित पवार स्पष्टच बोलले

नांदेड - आम्ही लाडक्या बहिणींना २१०० रुपये देणार नाहीत, असे बोललेलो नाही. पण सध्या आमची परिस्थिती नाही. परिस्थिती बदलल्यावर लाडक्या बहिणींना २१०० रुपये नक्की देऊ, असा पुनरुच्चार उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज नांदेड येथे एका सभेत बोलताना केला. राज्याच्या १३ कोटी जनतेचा ३६५ दिवसाचा हिशोब लावावा लागतो. सगळी सोंग करता येतात पैशांचे सोंग करता येत नाही. शासनाच्या तिजोरीत खडखडाट असल्याचे अनेक जण बोलतात. कृपा करून तुम्ही गैरसमज करून घेऊ नका, असेही अजित पवार म्हणाले.

राज्यात महायुती सरकार आल्यास लाडक्या बहिणींना १५०० रुपयांऐवजी २१०० रुपये देऊ, असे आश्वासन महायुतीच्या नेत्यांनी विधानसभा निवडणुकीच्या प्रचारावेळी दिले

(उर्वरीत पान २ वर)

### मी आर्थिक शिस्त लावण्याचा प्रयत्न करतोय

सगळी सोंग करता येतात पैशांची सोंग करता येत नाहीत. मला दिलेली योजना चालू ठेवायची आहे. सरकारला चालू ठेवायचे आहे. त्यामुळे यासाठी आम्ही नवीन पर्याय काढत आहोत. काही बँकांना आम्ही तयार केले आहे. जर तुम्हाला ५० हजार कर्ज काढून, एकत्र येऊन व्यवसाय करायचा आहे. लाडक्या बहिणींमध्ये ज्या महिला या योजनेत बसतात त्यांनी एकत्र येऊन २० एक महिला आल्या तर २० गुणिले ५०००० साधारण १० लाख रुपये घेऊन तुम्ही तुमचे काम करू शकता. वीस महिलांचे घेण्याला ३० हजाराने पैसे येतील. तुमच्या व्यवसायाचा हप्ता तुम्हाला या पैशातून देता येईल. हा उपाय राज्य सरकारने आणला आहे असे अजित पवार म्हणाले. त्यामुळे घाबरण्याचे कारण नाही तिजोरीत खडखडाट आहे असे समजू नका. मी आर्थिक शिस्त लावण्याचा प्रयत्न करतोय असेही अजित पवार म्हणाले.



## गावंदरा येथे अंगणवाडीच्या अर्धवट कामावर शाखा अभियंत्याने दिला शंभर टक्के निधी

प्रतिनिधी । धारूर
तालुक्यातील गावंदरा येथे अंगणवाडीच्या बांधकामात फरशी , खिडक्या , दरवाजे, अर्धवट प्लास्टर , गळके छत असतानाही पूर्ण बिल उचलण्याचे समोर आले आहे .शाखा अभियंता व गुत्तेदारांनी हा निधी लाटला असल्याची बाब समोर आली आहे .तालुक्यातील गावंदरा येथे अंगणवाडी बांधकामासाठी ११ लक्ष २५ हजाराचा निधी मंजूर झाला होता .सदरील अंगणवाडी बांधकाम हे जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा समोर करण्यात आलेले आहे .मागील सहा मोहिन्यापूर्वी अंगणवाडीचे छतापर्यंत बांधकाम करण्यात आलेले आहे .यानंतर अंगणवाडीचे कसल्याही प्रकारे बांधकाम करण्यात आलेले नाही .या बांधकामात कसले प्रकारे फरशी, खिडक्या, दरवाजे बसविण्यात आलेले नाहीत .तसेच



प्लास्टरही करण्यात आलेले नाही . नवी इमारत असतानाही छत गळत आहे .असा प्रकार असतानाही शाखा अभियंता ऋतुराज लांब यांनी गुत्तेदाराच्या मर्जीप्रमाणे मोजमाप पुस्तिका लिहून पूर्णपणे निधी उचलला आहे .मागील चार महिन्यापासून काम अर्धवट अवस्थेत आहे .गुत्तेदार मात्र हे काम कधी पूर्ण करणार असाही प्रश्न आहे .गुत्तेदाराने वेळेत काम पूर्ण न केल्यास संबंधित अभियंता यांच्यावर कारवाई करण्याची मागणी नागरिकांतून होत आहे .

या संदर्भात शाखा अभियंता ऋतुराज लांब यांच्याशी संपर्क साधला असता अंगणवाडीच्या कामासाठी दहा टक्के निधी मागे ठेवला आहे .उर्वरित काम संबंधित गुत्तेदारास करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत .

### अर्धवट कामावर उचलला निधी

गावंदरा येथे अकरा लक्ष रुपयांची अंगणवाडी बांधकाम करण्यात आलेले आहे .अर्धवट काम करून गुत्तेदाराने शाखा अभियंताच्या संगणमताने निधी उचलला आहे .मात्र अर्धवट राहिलेले काम कधी पूर्ण होणार असा प्रश्न निर्माण झाला आहे - छाया बडे,ग्रामपंचायत सदस्य गावंदरा

## आष्टी तालुक्यात येणार पाणलोट रथयात्रा, प्रशासन यंत्रणा सुसज्ज

आष्टी (प्रतिनिधी)
प्रत्येक गावात सामूहिक श्रमदानातून पाणलोट चळवळ निर्माण व्हावी या उद्देशातून केंद्र सरकारने राज्यातील ३० जिल्ह्यात पाणलोट यात्रा सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. बीड जिल्ह्यातील आष्टी तालुक्यात पाणलोट रथयात्रा शुक्रवार दि. २८ मार्च रोजी आष्टी तालुक्यात आगमन होणार असून वाघळुज व लमाण तांडा येथे रथयात्रा येणार असल्याची माहिती पाणलोट समिती वाघळूजच्या अध्यक्षा सुनंदा सुभाष गुंड यांनी दिली.

या यात्रेचे उद्घाटन आ. सुरेश धस यांच्या हस्ते होणार असून प्रमुख उपस्थिती म्हणून बीड जिल्हा जलसंधारण अधिकारी संजय आमले, तहसीलदार वैशाली पाटील, गटविकास अधिकारी गोकुळ बागलाणे, माजी आ. साहेबराव दरेकर, सरपंच परिषदेचे अध्यक्ष दत्ता काकडे आदी उपस्थित राहणार आहेत. या यात्रेच्या नियोजनासाठी व स्वागतासाठी प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणा तथा उपविभागीय




(उर्वरीत पान २ वर)

# अडीच वर्षे तरी काम अपूर्णच

## नागरिक संतप्त,अभियंत्यांस साडी चोळीचा आहेर

कडा । राजू म्हस्के
फक्त १७ किलोमीटर असलेल्या साबलखेड ते आष्टी हा राष्ट्रीय महामार्ग हा कडा शहरातून जात असून या महामार्गाच्या कामाला अडीच वर्षे पूर्ण होऊन सुद्धा काम अद्याप तरी अपूर्ण अवस्थेत आहे. शासनाने ठरवून दिलेल्या कालावधीत रस्ता पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधित अधिकारी व ठेकेदारावर असते परंतु काम पूर्ण न झाल्याने गेल्या हा महामार्ग शहरातून जात असलेल्या ग्रामीण भागातील नागरिकांना धुळीचा त्रास सहन करावा लागत आहे या रस्त्याचे काम संबंधित अधिकारी व ठेकेदार यांच्या कात्रीत अडकला की काय असा संशय नागरिक व्यक्त करत आहेत,लोकसभा व विधानसभेच्या निवडणुकीमध्ये आमदार, खासदार यांच्यात रस्त्याचे श्रेय घेण्यासाठी चढावढ पहावयास मिळाली.

श्रेयवाद जसा रंगला कसे अपूर्ण कामाचे श्रेय घेण्यासाठी मात्र कोणीही पुढे येत नाही याबाबत राष्ट्रीय महामार्ग अधिकारी व ठेकेदार यांना वारंवार सामाजिक कार्यकर्त्यांनी अनेक वेळा फोन करून निवेदन देऊन सदर काम वेळेत पूर्ण करावी करावे असे विनंतीवजा आंदोलनाचा इशारा सुद्धा दिला होता परंतु अधिकारी व ठेकेदार याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करताना दिसत आहे

सततच्या फुफाट्यामुळे श्वसनाचे त्रास

१) कासव गतीने चालू असलेल्या रस्ता यामुळे वाहनधारक, दुतर्फा राहणे नागरिक यांना सततच्या धुळीमुळे श्वसनाचे त्रास सुरू झाले आहेत.

२) राष्ट्रीय महामार्ग शहरातून जात असल्याने धुळीचे लोट निर्माण होत आहेत त्यामुळे बाजार पेठेवर मोठा परिणाम झालेला असून दोन्ही बाजूला सुरू असलेल्या दुकानदारांवर उपासमारीची वेळ आली आहे बँकेचे कर्ज काढून सुरू केलेल्या व्यवसायिकांना बँकेचे हप्ते कसे भरायचे ? अशी चिंता सतावत आहे

३) सध्या कडा बसस्थानक,संग्राम चौक ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक याठिकाणी नुसता रस्ता खोदून कडा शहराचे पार वास्तू

(उर्वरीत पान २ वर)




### स्थानिक आजी माजी लोकप्रतिनिधीनी लक्ष देण्याची गरज

गेल्या अडीच वर्षापासून साबलखेड ते आष्टी या सत्र किलोमीटर असलेल्या राष्ट्रीय महामार्गाचे काम अधिकारी व ठेकेदार यांच्या मनमानी कारभारामुळे वेळेत पूर्ण न झाल्याने लोकांचे आरोग्याचे प्रश्न उपस्थित झाला असून नागरिकांना श्वासनाचे आजार होत आहे याला जबाबदार कोण ? असा प्रश्न स्थानिक विचारत आहेत तसेच कर्तव्य शून्य अधिकारी व ठेकेदार यांना आजी-माजी लोकप्रतिनिधीनी समज देण्याची गरज आहे.

## प्रसिद्ध नेत्रतज्ज्ञ डॉ. के. डी. पाखरे संयमी व्यक्तिमत्व काळाच्या पडद्याआड - डॉ संजय तांदळे

बीड ।प्रतिनिधी
मातृभुमी प्रतिष्ठानच्या कार्यालयात दि. २३ मार्च २०२५ रोजी प्रसिद्ध नेत्रतज्ज्ञ डॉ. के. डी. पाखरे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. यावेळी मातृभुमी प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. संजय तांदळे यांनी सामाजिक कार्यकर्त्या सुशीलाताई मोराळे यांचे पती पाटोदा तालुक्यातील भायाळा गावचे भूमिपुत्र डॉ. के. डी. पाखरे यांच्या आठवणींना उजाळा देताना म्हणाले की, डॉ. साहेबांचे शिक्षण प्रतिकूल परिस्थितीत झाले होते. विद्यार्थी दशेत विविध चळवळीशी ते जोडले गेले होते. त्यांचा स्वभाव शांत संयमी व मनमिळावू होता. प्रत्येक रुग्णाशी ते आत्मीयतेने संवाद साधत उपचार करत होते. निराधार व गोरगरीब रुग्णांना त्यांनी निशुल्क सेवा दिली. पतंजली योग परिवारात नित्यनियमाने



(उर्वरीत पान २ वर)

## पैठण पंढरपूर राष्ट्रीय महामार्ग (पालखी मार्ग) अपुरा

पाटोदा (प्रतिनिधी)
मार्च २०२५ मध्ये पाटोदा शहरांमध्ये काम सुरू केले आहे, परंतु रस्त्याचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे आहे. अनेक ठिकाणी रोड काँक्रीट मध्ये स्टीलचा वापर केलेला नाही तसेच ज्या ठिकाणी थोडाफार केलेले आहे त्या स्टीलची जाडी अत्यंत कमी आहे दर्जाहीन काम चालू आहे. सदरील ठेकेदार याच्या कामावर प्रशासनाचे नियंत्रण दिसत नाही सदरील ठेकेदार व प्रशासन जनतेवर उपकार केल्यासारखे रोडचे काम करत आहे. तसेच चुंभळी ते डोंगरकिन्ही मार्गावरील घाटाचे काम अद्याप पर्यंत सुरू नाही व अनेक ठिकाणी पैठण ते पंढरपूर पर्यंत अद्याप पर्यंत काम अपूर्णच आहे. त्यामुळे याप्रकरणी १.सचिव रस्ते वाहतूक व राष्ट्रीय महामार्ग मंत्रालय नवी दिल्ली

२.सचिव रेल्वे विभाग नवी दिल्ली
३.सचिव सार्वजनिक बांधकाम विभाग मंत्रालय मुंबई ४.कार्यकारी अभियंता राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग

(उर्वरीत पान २ वर)



शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
Bureau of Indian Standards
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777
6 x 6.5

# संपादकीय

## गुंतवणुकीचा पहाटवारा

कोकणातील पाच जिल्ह्यांमध्ये ८००० कोटी रुपयांच्या प्रकल्पांची घोषणा, ३३१ उद्योजकांचे करार आणि ७२ हजार रोजगार निर्मितीची आशा आहे. ऊर्जा, औषधनिर्माण, रसायने, अभियांत्रिकी आणि जैवतंत्रज्ञान क्षेत्रांमध्ये गुंतवणूक प्रस्ताव आहेत. ठाण्यासह, पालघर, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्गमध्ये नवीन उद्योगसंस्थांची उभारणी होईल. औद्योगिक विकासासाठी कोकणवासीयांना मोठे उपाययोजना गरजेच्या आहेत.

काही काळापूर्वी झालेल्या अतिविशाल प्रकल्पांच्या घोषणांपाठोपाठ कोकणातील पाच जिल्ह्यांमध्ये आठ हजार कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचे करार, ही होळीनिमित्त कोकणवासीयांना मिळालेली भेटच म्हणावी लागेल. ठाण्यात झालेल्या कोकण विभागीय गुंतवणूक परिषदेत वेगवेगळ्या क्षेत्रांमधील ३३१ उद्योजकांनी उद्योगांच्या स्थापनेबाबत सरकारशी करार केले असून, त्यातून सुमारे ७२ हजार नव्या रोजगारांची निर्मिती होण्याची आशा आहे. त्यामध्ये ऊर्जा, औषधनिर्माण, निर्यात, रसायने, अभियांत्रिकी, कपडे उत्पादनापासून माहिती तंत्रज्ञान आणि जैवतंत्रज्ञान क्षेत्र असे वैविध्य आहे. काही काळापूर्वीच 'वेल्लोर इन्फोटेक' किंवा 'रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर'ने उद्योग स्थापनेबाबत दाखविलेला रस, त्यातून येऊ घातलेला अतिविशाल दारूगोळा निर्मिती प्रकल्प यापाठोपाठ नव्याने झालेल्या या करारांमुळे कोकणात उद्योगसंस्कृती उभी राहण्याची आशा निर्माण झाली आहे. यामध्ये औद्योगिकदृष्ट्या आघाडी घेतलेल्या ठाण्यामध्ये सर्वाधिक म्हणजे पावणेपाच हजार कोटी रुपयांची गुंतवणूक येणे साहजिक आहे. त्यापाठोपाठ पालघर, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग या जिल्ह्यांतही प्रकल्प सुरू करण्याबाबत उद्योजकांनी कमीअधिक प्रमाणात रस दाखविला आहे. उद्योगांबाबत कागदावर झालेला करार प्रत्यक्षात आणण्याचे आव्हान आता सरकारपुढे असेल.

उद्योगांच्या स्थापनेमध्ये महाराष्ट्राने स्थापनेपासूनच देशात आघाडी घेतली होती; पण आता उद्योग आणि आर्थिक प्रगतीचे सर्वच राज्यांना भान आले असून, त्यातून राज्यापुढे मोठी स्पर्धा उभी राहिली आहे. प्रामुख्याने मुंबई, पुणे व नाशिक या त्रिकोणात महाराष्ट्रातील औद्योगिक प्रगती वाढली आणि विकासाचे एक असंतुलन निर्माण झाले. त्यानंतर विदर्भ-मराठवाड्यातही उद्योग नेण्याचे प्रयत्न सुरू झाले. या स्पर्धेत कोकण मात्र मागे पडला. याला अनेक कारणे आहेत. माजी मुख्यमंत्री बॅ. अ. र. अंतुले यांनी पुढाकार घेऊन रायगड व परिसरात काही मोठे कारखाने आणले. नंतर मात्र कोकणच्या औद्योगिक विकासाच्या गाडीने अपेक्षित वेग घेतला नाही. वीज, पाणीपुरवठा, रस्ते आणि बँकिंगसारख्या सुविधा आदींचा अभाव हे त्यामागील प्रमुख कारण. देशातील महत्त्वाचा महामार्ग असलेल्या मुंबई-गोवा रस्त्याच्या दुरवस्थेचे दुष्टचक्र थांबलेले नाही. इतर रस्त्यांचा विकास आणि दळणवळणाची साधने यांबाबतही समाधानकारक स्थिती नाही. राजकीय उदासीनता आणि स्थानिकांचा विरोध ही अन्य काही कारणे आहेत. कोकणात येऊ घातलेल्या नव्या कारखान्यांचे स्वागतच विरोधाने होते, असा समज निर्माण झाला आहे. पाच दशकांपूर्वीच्या 'स्टरलाइट' प्रकल्पापासून 'एन्रॉन', 'जैतापूर', 'बारसू' अशा प्रकल्पांची यादी मोठी आहे. प्रदूषणकारी प्रकल्पांना विरोध करण्यामागे स्थानिकांच्या मनात अनेक चिंता आहेत आणि त्या रास्तही आहेत. मात्र, त्यावर मार्ग काढता येऊ शकतो. काही उद्योगांमुळे नद्या-समुद्रकिनाऱ्यांचे होणारे प्रदूषण, आंब्यासारख्या पिकांना धोका होण्याची शक्यता, त्यातून आजवर कोकणच्या अर्थव्यवस्थेचा आधार असलेले पर्यटन, फलोत्पादन आणि मासेमारीला बसणारा फटका याबाबत सुवर्णमध्य काढणे आणि उपाययोजना करून स्थानिकांच्या मनांत विश्वास निर्माण करणे गरजेचे आहे.

कोणत्याही नव्या प्रकल्पाची चर्चा सुरू झाली, की एकीकडे सर्वसामान्य प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या तोंडाला पाने पुसली जातात, तर दलाल आणि बड्या धेंडांकडून मोठ्या प्रमाणात जमीनखरेदी होते. त्यामुळे पारदर्शक भूसंपादन करून या विकासाची फळे स्थानिकांपर्यंत पोहोचविणे, हे सरकारपुढील आव्हान आहे. काही काळापूर्वी कोकण रेल्वेचे स्वप्न साकार झाल्याने कोकणवासीयांच्या मनात विकासाची नवी स्वप्ने निर्माण झाली; पण त्यानंतरही कोकणात औद्योगिक-आर्थिक विकासाने मोठी गती घेतलेली नाही. आता आसपासच्या परिसरातून या विकासाला पूरक पायाभूत सुविधा उभ्या राहत आहेत. विशेषत: जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्टनंतर वाढवणच्या रूपाने निर्यातीचे महाद्वार लवकरच खुले होत आहे. सोबतच कोकण परिसरात लहानमोठ्या जेट्टीही उभ्या राहत आहेत. नवी मुंबईतील विमानतळाने शेतीमाल व औद्योगिक उत्पादनांसाठी जगाची बाजारपेठ जवळ येत आहे.

# शिक्षकांचे प्रेरणास्थान - श्री.संदिप पवार सर

बीड (प्रतिनिधी)

जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळा शिक्षण हीच प्रगतीची गुरुकिल्ली असल्याची जाणीव ठेवून आष्टी मतदारसंघातील जरेवाडी येथील जिल्हा परिषद शाळेतील आदर्श शिक्षक श्री. संदीप पवार यांनी एक नव्हे, दोन नव्हे, तर तब्बल तीन दशके अथक परिश्रम घेत, ऊसतोड मजुरांच्या पाल्यांसाठी ज्ञानदीप तेवता ठेवला. १९९५ पर्यंत केवळ २४ विद्यार्थ्यांची पटसंख्या असलेल्या या शाळेचे रूपांतर त्यांनी आपल्या मेहनतीने व समर्पणाने एका आदर्श शाळेत केले.

आज या शाळेत पंचवीस वर्ग, विविध विषयांचे प्रशिक्षित शिक्षक आणि तब्बल ८०० हून अधिक विद्यार्थी शिकत आहेत. स्थलांतरित होणाऱ्या विद्यार्थ्यांना शाळेतच शिक्षण घेता यावे, त्यांना शिष्यवृत्ती मिळावी आणि शिक्षणाच्या प्रवाहात त्यांचा ठाम सहभाग राहावा, यासाठी त्यांनी विविध उपक्रम राबवले. त्याच बळावर गेल्या दहा वर्षांत ४०० हून अधिक विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळवून देण्याचा महत्त्वपूर्ण टप्पा त्यांनी गाठला.


या अतुलनीय योगदानाची दखल घेत मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा स्पर्धेत जरेवाडी शाळेने बीड जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावला, तर विभागात तृतीय क्रमांक मिळवून ११ लाख रुपयांचे पारितोषिक मिळवले. विशेष म्हणजे, बीड जिल्ह्यातील आय. एस. ओ. मानांकन मिळवणारी ही पहिलीच जिल्हा परिषद शाळा ठरली. याच कार्याची दखल घेत लोकमत समूहाच्या वतीने आदर्श शिक्षक श्री. संदीप पवार यांना लोकमत ऑफ द इयर या प्रतिष्ठित पुरस्काराने गौरविण्यात आले. महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते त्यांना सन्मानित करण्यात आले. यावेळी मुख्यमंत्री मा. श्री. देवेंद्रजी फडणवीस, उपमुख्यमंत्री मा. श्री. एकनाथजी शिंदे, लोकमत समूहाचे मा. श्री. राजेंद्र दर्डा आणि इतर मान्यवरांच्या उपस्थित होते. आदर्श शिक्षक श्री. संदीप पवार यांनी आपल्या अथक प्रयत्नांनी शिक्षण क्षेत्रात अमूल्य योगदान देत एक आदर्श निर्माण केला आहे. त्यांच्या कार्याची ही गगनभरारी इतर शिक्षकांसाठी आणि समाजासाठी नक्कीच प्रेरणादायी ठरेल यात तिळमात्र शंका नाही.




# महेश सहकारी साखर कारखाना पुन्हा सुरु करण्याचा भीमराव धोंडे यांचा मनोदय

आष्टी (प्रतिनिधी)

आष्टी तालुक्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांसाठी महत्त्वाचा असलेला महेश (कडा) सहकारी साखर कारखाना पुन्हा सुरू करण्याचा मनोदय माजी आमदार भीमराव धोंडे यांनी बोलून दाखवला. रविवारी कडा येथे एका कार्यक्रमासाठी आले असताना या कार्यक्रमादरम्यान बोलताना त्यांनी हे मत व्यक्त केले. माजी आमदार भीमराव धोंडे म्हणाले की, ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या दृष्टीने साखर कारखाना सुरू होणे महत्त्वाचे आहे. स्वत:च्या कार्यक्षेत्रात साखर कारखाना नसेल तर बाहेरच्या कारखान्याला ऊस देताना अनंत अडचणींचा सामना करावा लागतो. उसतोड उशिरा होते. भाव चांगला मिळत नाही. पैसे वेळेवर मिळत नाहीत त्यामुळे आपला हक्काचा कारखाना असणे महत्त्वाचे आहे.



सततच्या दुष्काळी परिस्थितीमुळे २००७ पासून महेश ( कडा ) सहकारी साखर कारखाना बंद होता आणि त्यानंतर महाराष्ट्र सहकारी बँकने कारखाना ताब्यात घेतला होता. कारखाना एनपीएत गेला होता. त्यानंतर ब-याचदा हा कारखाना भाडेतत्वावर चालविण्यास देण्यासाठी अनेकदा टेंडर काढण्यात आले होते. कोणीही कारखाना चालविण्यास घेतला नाही म्हणुन विद्यमान संचालक मंडळानेच आता हा कारखाना चालविण्याचा निर्णय घेतला आहे. हा कारखाना सुरू होण्यासाठी मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस आणि सहकार मंत्री ना. बाबासाहेब पाटील यांच्याशी चर्चा देखील केली आहे. लवकरच याविषयी सविस्तर कार्यवाही संदर्भात भेटणार आहे. हा कारखाना सुरू करण्याचा अन्य कोणाचा इरादा असेल तर आपण त्यालाही आडकाठी आणणार नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. साखर कारखाना सुरू राहिला तर फक्त कामगार आणि शेतकरी यांचाच फायदा होतो असे नाही तर इतर अनेकांनाही वेगवेगळ्या माध्यमातून रोजगार प्राप्त होत असतो. त्यामुळे आष्टी तालुक्यातील साखर कारखाना सुरू झाला तर त्याचे जनतेकडून स्वागतच होणार आहे.

# वसुदेव बप्पा गायकवाड फाउंडेशन मध्ये विविध कार्यक्रम संपन्न

केज/प्रतिनिधी

वसुदेव बप्पा गायकवाड फाउंडेशन,केज ता.केज जि.बीड यांच्या वतीने विविध कार्यक्रम,उपक्रम संप संपन्न झाले.दि.२३ मार्च२०२५ रोजीसंस्थेच्या केज येथील कार्यालयात जागतिक हवामान दिन साजरा करण्यात आला. या वेळी हवामान बदल - वातावरणातील बदल याविषयी शिबीर घेण्यात आले. दिनांक २२ मार्च २०२५ रोजी जागतिक जलदिन साजरा करण्यात आला. पाण्याचे महत्व व पाण्याचा काटकसरीने वापर,पाण्याचे स्त्रोत बळकटीकरणाची गरज व पाण्याची जपणूक या विषयी कार्यशाळा घेण्यात आली. दिनांक २१ मार्च २०२५ रोजी जागतिक वन दिन साजरा करण्यात आला. वनांचे महत्व,गरज आणि पर्यावरण रक्षणा विषयी कार्यशाळा घेण्यातआली. दिनांक २० मार्च २०२५ रोजी जागतिक चिमणी दिवस चिमण्यांसाठी खिडक्यात,दारात,भिंती वर,वाट्यांमध्ये दिवसभर चिमण्यांसाठी पाणी ठेवून साजरा करण्यात आला.दिनांक १८ मार्च २०२५ रोजी स्वराज्य संकल्पक छत्रपती शहाजीराजे भोसले यांची जयंती साजरी करण्यात आली.दिनांक १६ मार्च २०२५ रोजी तुकाराम बीज बिजोत्सव म्हणून साजरी करण्यात आली.दिनांक १५ मार्च २०२५ रोजी जागतिक ग्राहक दिन साजरा करण्यात आला. ग्राहकांचे हक्क,अधिकार, कर्तव्य,जबाबदारी या विषयीकार्यशाळा घेण्यात आली.या विविध कार्यक्रमात संस्थेचे संस्थापक संचालक व संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भैय्या गायकवाड,आम्रपाली सोनवणे,प्रियांकासोनवणे,साक्षी सोनवणे,प्रितम डोईफोडे यांच्या सह मान्यवरांनी मार्गदर्शन केले.प्रत्येक कार्यक्रमाचे प्रास्ताविक,सुत्रसंचलन व आभार प्रदर्शन आनंद भैय्या गायकवाड यांनी केले.

# प्रतिकुल परिस्थितीवर मात करत स्वप्नीलची यशाला गवसनी

आष्टी (प्रतिनिधी)

आष्टी तालुक्यातील सय्यदमीर लोणी येथील रहीवाशी असणारा युवक स्वप्नील भोसले यांचे वडील उद्धव भोसले हे ट्रॅक्टर ड्रायव्हरचे काम करतात तर आई घरकाम करते. घरची परिस्थिती साधारण मात्र यावर मात करत लोणी सय्यदमीर येथील युवक स्वप्निल उद्धव भोसले यांनी इंडियन आर्मी मध्ये निवड होऊन यश संपादन केले. स्वप्निल चे वडील उद्धव भोसले यांनी घराचा रहाटगाडा हाकण्यासाठी ड्रायव्हरची नोकरी पत्करली. घरची परिस्थिती लक्षात घेऊन स्वप्निल ने शिक्षण घेण्यास सुरुवात केली. घरच्या याही परिस्थितीमध्ये स्वप्नीलने अभ्यासावर कोणताही परिणाम होऊ दिला नाही व स्पर्धा परीक्षेचा चिकाटीने अभ्यास केला. मात्र त्याच्या या अथक प्रयत्नांना यश येऊन त्याची इंडियन आर्मी मध्ये निवड झाली. अशा गुणवंत विद्यार्थ्यांचे शिक्षण केवळ परिस्थितीमुळे अडू नये यासाठी सामाजिक संस्था व गावातील राजकीय व्यक्ती यांनी पुढाकार घेणे गरजेचे आहे.



जिद्दीसमोर बिकट परिस्थिती देखील हार पत्करते - परिस्थिती कितीही बिकट असली, तरीही काही माणसं जिद्द सोडत नाही. नियती अग्निपरीक्षा घेत असते, मात्र त्यातूनही काही जण अगदी ताऊन सुलाखून निघतात. संकटांना थेट भिडणारी आणि आभाळ कोसळलं तरी त्यावर पाय रोऊन उभं राहणारी माणसं इतरांसाठी आदर्श ठरतात. परीक्षा ही बळ देते फक्त एखादी गोष्ट पूर्ण करण्यासाठी अभ्यासू वृत्ती आणि चिकाटी असली पाहिजे. मग जिद्दीसमोर बिकट परिस्थिती देखील हार पत्करते. हेच पुन्हा एकदा स्वप्निल उद्धव भोसले याच्या यशावरून समोर येतंय. त्याने अत्यंत कठीण परिस्थितीत मिळवलेले यश हे खरच आदर्शवत असल्याचे पंचक्रोशीतील नागरिक सांगत आहे. या यशाबद्दल त्याचे आष्टीसह बीड व अहिल्यानगर जिल्ह्यातून कौतुक होत आहे.



# सामाजिक कार्याची तळमळ असणाऱ्या अरुणरावजी गुरसाळी यांचा सन्मान

वडवणी (प्रतिनिधी)

वडवणी शहरातील सामाजिक कार्यामध्ये ज्यांचं नाव प्रधान्याने घेतल्या जाते असं व्यक्तीमत्व, वडवणी गावाच्या तत्कालीन ग्रामपंचायतचे माजी सरपंच तथा अतिशय मनमिळाऊ आणि सामाजिक समस्यांबद्दल सखोल अभ्यास असणारे अखिल महाराष्ट्र कोष्टी समाज परिषदे आणि अखिल महाराष्ट्र कोष्टी सेवा मंडळाच्या माध्यमातून महाराष्ट्रात विविध ठिकाणी सामाजिक, धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये उत्साहाने सहभागी होणारे सुप्रसिद्ध योग आणि आयुर्वेदाचार्य रामलिंग पथ संस्थाचे संस्थापक संचालक श्री अरूणरावजी गुरसाळी यांना नुकताच महाराष्ट्र कोष्टी समाज सेवा मंडळ, मुंबई यांच्या वतीने समाजभूषण पुरस्कार देवून सन्मान करण्यात आला.त्या बद्दल वडवणी शहरातील सर्व मित्रपरिवाराच्या वतीने त्यांचा सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.या प्रसंगी सर्व श्री नवनाथराव म्हैत्रै,सुरेशराव दिवटे,अनिलराव म्हैत्रे,शिवाजीराव वरवडे, कैलासराव भुजबळ,रामेश्वर रेडेकर, कैलास गुरसाळी,विठ्ठल वरवडे संजय खाटवकर,हनुमंत वरवडे,डिगांबर पतंगे,अलगट,अँड. उजगरे, मुडे,पांडुरंग टकले, सुरेश दिवटे,सुदाम खाटवकर सर इत्यादी उपस्थित होते.

### पान १ वरून..

**आष्टी तालुक्यात...**

जलसंधारण अधिकारी सतिश पाटील आणि त्यांचे सहकारी परिश्रम घेत आहेत.

पाणलोट कामांवर श्रमदान अपेक्षित

सर्व यंत्रणांना एकत्र येऊन गावोगावी पाणलोट चळवळ निर्माण व्हावी, या अनुषंगाने मृद व जलसंधारण कामांचे भूमिपूजन करणे, पाणलोट कामांवर श्रमदान करणे, पाणलोट योद्धे निवडणे इत्यादी कामांचे सूक्ष्म नियोजन करून या उपक्रमांतर्गत शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी, बचत गटातील महिला, स्वयंसेवी संस्था व शेतकरी यांनी मोठ्या प्रमाणात सहभागी व्हावे यासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत, असे आवाहन बीड जिल्हा जलसंधारण अधिकारी संजय आमले यांनी केले आहे.

**अडीच वर्षे तरी..**

केलेली दिसते कसलेही काम झालेले नाही.मोतीलाल कोठारी विद्यालय प्रवेशद्वारासमोर एकच बाजू झालेली आहे.

मौत का कुआ.....

शेरी बु!! व खाकळवाडी येथील पुलाचे काम अतिशय संथ गतीने चालू असल्याने सम्पूर्ण रस्ता खोदून मुरूम टाकलेला आहे. रस्त्यावर खाचखळगे, फुफाटा आहे. पर्यायी वळण रस्ता हा रस्ता नसून मौत का कुआ असून त्या रस्त्यावर कोणत्याही प्रकारची सुरक्षितता दिसून येत नाही दोन्ही बाजूला खोल नदी पात्र आहेत दुर्दैवाने घटना घडली तर त्याला जबाबदार कोण?असा प्रश्न सामाजिक कार्यकर्ते अनिल ढोबळे यांनी विचारला आहे

अभियंत्यांस साडी चोळीचा आहेर

साबलखेड आष्टी महामार्गावरील सतरा किलोमीटरचे काम दोन वर्षापासून अत्यंत धिम्यागतीने सुरू असून या रस्त्याच्या रखडलेल्या कामामुळे कडा येथे नागरिकांना व वाहनचालकांना धुळीचा प्रचंड त्रास सोसावा लागत आहे . या रस्त्याच्या कामासाठी होत असलेल्या दिरंगाईचा निषेध म्हणून कडा येथील सरपंच युवराज पाटील यांनी व

### पान १ वरून..

नागरिकांनी भोपळे नामक अभियंत्याला साडी चोळीचा आहेर देत गांधीगिरी मार्गाने निषेध केला.

जनहित याचिका दाखल करणार:-डॉ.नाथ

लवकरात लवकर राष्ट्रीय महामार्गाचे काम पूर्ण करून नागरिकांची होणाऱ्या धुळीच्या त्रासापासून मुक्तता करावी नसता जनहितार्थ याचिका दाखल करणार आहोत.अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ.महेश नाथ यांनी राष्ट्रीय महामार्गाचे प्राधिकरण केंद्रीय सचिव,महाराष्ट्राचे सचिव, मराठवाड्याचे पी.डब्लु.डी चे मुख्य कार्यकारी अभियंता, बीड जिल्हाधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

**पैठण पंढरपूर..**

औरंगाबाद ५.मुख्य अभियंता तथा विभागीय अधिकारी राष्ट्रीय महामार्ग ठ.छे. ५०८,५०९ पाचवा मजला कोकण भवन सीबीडी बेलापूर,नवी मुंबई ६.मूख्य वनसंरक्षक नागपूर महाराष्ट्र ७.उपमुख्य अभियंता मध्य रेल्वे अहमदनगर. यांच्या विरोधात माननीय उच्च न्यायालयामध्ये कॉ.महादेव नागरगोजे, ह. भ. प. रामकृष्ण रंधवे बापू, चक्रपणि जाधव यांच्यामार्फत अवमान याचिका दाखल केलेली असून सदरील याचिकेची सुनावणी १५ एप्रिल २०२५ रोजी होणार आहे. सदरील महामार्गाचे संपूर्ण काम जोपर्यंत कार्यारंभ आदेशाप्रमाणे चांगल्या दर्जाचे होत नाही तोपर्यंत पाठपुरावा करणार असल्याची माहिती ड .नरसिंह लक्ष्मण जाधव (उच्च न्यायालय संभाजीनगर खंडपीठ( यांनी दिलेली आहे.

**प्रसिद्ध नेत्रतज्ज्ञ डॉ. के. ..**

योगसाधना करत अनेक योग शिबिर त्यांनी घेतले. डॉ .मित्र परिवारात ते सातत्याने संपर्कात राहुल मित्रांची संवाद साधत होते.बीड जिल्ह्यातील गोरगरीब रुग्णांचा सहारा गेला असे डॉ संजय तांदळे यांनी म्हंटले . श्रद्धांजली सभेस प्रा. डी.जी. तांदळे ,डॉ. संजय तांदळे ,लक्ष्मण चाटे, प्रा.अशोक नागरगोजे, प्रा. बाळासाहेब नागरगोजे, बाजीराव ढाकणे, रवींद्र मुंडे, डॉ. ज्ञानेश्वर जोशी, डॉ .आनंदकुमार लिंबमकर , संतोष गर्जे, बाळासाहेब खाडे, पांडुरंग जायभाये आदींची उपस्थिती होती.

### पान १ वरून...

**लाडक्या बहिणींना..**

होते. निवडणुकीत महायुतीला प्रचंड बहुमत मिळाले. यानंतर लाडक्या बहिणींना २१०० रुपये कधी मिळणार असा प्रश्न विचारला जात होता. अर्थसंकल्पीय अधिवेशनात याबाबत घोषणा होईल, असे वाटत होते. मात्र, अर्थसंकल्पात याबाबत कोणतीही घोषणा सरकारच्या वतीने करण्यात आली नाही. त्यानंतर विरोधकांनी लाडक्या बहिणींना २१०० रुपये देण्यावरून सरकारवर टीका केली होती.

मला राज्याच्या १३ कोटी जनतेचा हिशोब लावावा लागतो

शासनाच्या तिजोरीत खडखडाट असल्याचे अनेक जण बोलतात. कृपा करून तुम्ही गैरसमज करून घेऊ नका. मी आपल्या राज्याचा सर्वात मोठा अर्थसंकल्प ७ लाख २० कोटी रुपयांचा अर्थसंकल्प सादर केला आहे. यामध्ये पेन्शन, होणारे पगार, राज्य सरकारने काढलेल्या कर्जांचा व्याज जाईल. राहिलेला पैसा माझ्या लाडक्या बहिणींसाठी आहे. विरोधक ही योजना बंद करतील असे म्हणत होते. अनेक महिला भेटल्या. त्यांनीही मला विनवले १५०० रुपये देता २१०० रुपये द्या. मी नाही म्हटलेले नाही. ज्यावेळेस राज्य सरकारची परिस्थिती ही अधिक योग्य होईल त्यावेळी तुम्हाला २१०० रुपये देणार. पण आता मी सगळा हिशोब केला. तुम्ही जसा तुमचा संसार करताना महिन्याचा हिशोब लावता कसा मला राज्याच्या १३ कोटी जनतेचा ३६५ दिवसाचा हिशोब लावावा लागतो, असे अजित पवार म्हणाले.

२१०० काय ३ हजार देऊ, पण थोडा वेळ थांबा

दरम्यान, लाडकी बहीण योजना सुरुच रहाणार आहे, या योजनेसाठी ३६ हजार कोटी रुपयांची तरतुद केली आहे. २१०० काय तीन हजार रुपये देऊ पण थोडा वेळ थांबावे लागेल, असे आमदार परिणय फुके म्हणालेत. मी तुम्हाला दाव्याने सांगतो, २१०० नाही तर तीन हजार रुपये देऊ पण काही दिवस थांबावे लागणार आहे. आमच्या लाडक्या बहिणींचा आमच्यावर विश्वास आहे. त्यांनी आम्हाला मोठ्या मताधिक्याने निवडून दिले आहे. त्याची परतफेड आम्ही करणार आहोत, १५०० रुपये सुरू ठेवणार आहोत, आणि पुढे जसजशी राज्याची परिस्थिती सुधारेल तसतशे २१०० रुपये देऊ आणि आणखी सुधारली तर ३००० हजार रुपये देऊ, असे आमदार परिणय फुके यांनी म्हटले आहे.


हे पत्रक, मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक श्री वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटर्स ॲण्ड पब्लिशर्स, मोंढा रोड,बीड जि.बीड -४३११२२ येथे छापून साप्ताहिक शिववाणी बीड कार्यालय : घर नं.१०२, छत्रपती कॉलनी, क्रांती नगर, तहसीलच्या मागे, बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथून प्रसिध्द केले. (सर्व वाद बीड न्यायकक्षेत).

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT INDRADHANUSHYA PRINTERS & PUBLISHERS, MONDHA ROAD, BEED, DIST.BEED-431122 AND PUBLISHED AT H.No.102, CHATRAPATI COLONY, KRANTI NAGAR, TAHASIL BACKSIDE, BEED-431122(MAHARASHTRA) (JURISDICTION AT BEED)

## डॉ.हिकमत उढाण विधानसभेवर निवडून आल्याबद्दल वडीरामसगाव येथे भंडाऱ्याचा कार्यक्रम संपन्न

घनसावंगी ।प्रतिनिधी

घनसावंगी मतदार संघातून डॉ. हिकमत उढाण हे निवडून यावे याकरिता मतदार संघातील अनेक गावातून कार्यकर्त्यांनी देवाला साकडे घालून नवस केले होते.त्यातच वडीरामसगाव येथील डॉ. लक्ष्मण त्रिंबकराव जाधव यांनी डॉ. हिकमत उढाण हे निवडून यावे याकरिता मारोती मंदिरावर भंडारा करण्याचा संकल्प केला होता. त्याअनुषंगाने त्यांनी २३ मार्च रोजी आ.हिकमत उढाण यांचा सत्कार करून भंडाऱ्याचा नवस पूर्ण केला.



यावेळी आ.हिकमत उढाण यांनी वडीरामसगाव या गावात मी निवडणुकीत सांगितलेल्या विकास कामाची वचनपूर्ती लवकरच पूर्ण करेल अशी ग्वाही गावाकऱ्यांना दिली. व मी आमदार होण्यासाठी डॉ. लक्ष्मण जाधव यांनी नवस करून आज तो नवस फेडला याबद्दल त्यांना धन्यवाद दिले. यावेळी त्यांच्यासोबत शिवसेना तालुकाप्रमुख उद्धवराव मरकड, पंचायत समिती सदस्य अनिरुद्ध शिंदे,सरपंच अनिल सानप, सरपंच राजुभाऊ वाडेकर, अण्णा वाडेकर,सरपंच डिगंबर ढेरे यांच्यासह शिवसैनिक व ग्रामस्थ मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

## घनसावंगी बस स्थानकावर पिण्याच्या पाण्याची सोय करा

### यासाठी प्रवाशांचे आ.उढाण यांना निवेदन

घनसावंगी ।प्रतिनिधी

घनसावंगी हे तालुक्याचे ठिकाण असून तेथे सुंदर असे बसस्थानक नुकतेच बांधण्यात आले आहे.त्याठिकाणी प्रवाशांना पिण्याच्या व वापराच्या पाण्याची व्यवस्था नसल्याने प्रवाशांची गैरसोय होत आहे.तसेच बसस्थानकवर नगरपंचायत कडून लाखो रुपये खर्च करून बांधलेले शौचालयु पाण्यावाचून बंद आहे. तसेच तेथे सेक्युरिटी गार्ड नाही. त्यामुळे नवीन बसस्थानक चोर व दारुड्याचा अड्डा बनत चाललेले दिसत असल्याने आमदार निधीतून तात्काळ पाण्याची व्यवस्था करण्याची मागणी वडीरामसगाव येथील जेष्ठ समाजसेवक बाबुराव लाड यांनी लेखी निवेदनाद्वारे केली.

## बिबट्याने गायीची शिकार केल्याने रोहिलागड नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण



रोहिलागड ।प्रतिनिधी

अंबड तालुक्यातील मौजे रोहिलागड डोंगराळ परिसर असल्याने बिबट्याचा मुक्त संचार वाढला आहे. रोहिलागड शिवारातील गट नंबर ६३९ उमेश राधाकिसन वाघबीर व योगेश राधाकिसन वाघबीर यांची शेती असून त्यांनी शेतातील आपल्या गोठ्यात गायीला बांधले होते.संध्याकाळी नऊ वाजता ते आपल्या शेतातून घरी परत आले, दुसऱ्या दिवशी सकाळी नेहमीप्रमाणे ते आपल्या शेतातील गोठ्यात गेले असता त्यांना त्यांची गाय मृत अवस्थेत आढळून आले असून दहा ते साडेअकराच्या दरम्यान बिबट्याने गाईवर हल्ला चढवला असावा असा अंदाज त्यांनी व्यक्त केला. सदरील घटनेची माहिती त्यांनी वन अधिकारी पाटील यांना मिळाली असता त्यांनी सदरील घटनेच्या ठिकाणी जाऊन घटनेचा पंचनामा करून पशुवैद्यकीय डॉक्टर वाघ यांना कळवून सदरील गाईचे शवविच्छेदन केले. शेतकऱ्याला शासनाने तात्काळ नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी त्या शेतकऱ्यांनी वनविभागाकडे केले असून बिबट्याचा बंदोबस्त करावा अशी मागणी केली आहे.



## माजी आमदार जेथलियांकडून जिल्हाप्रमुख ए जे बोराडे यांचा सत्कार

डॉ आशिष तिवारी/मंठा

मंठा कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती ए जे पाटील बोराडे यांची शिवसेनेच्या जालना जिल्हाप्रमुखपदी नियुक्ती झाल्याबद्दल माजी आमदार सुरेशकुमार जेथलिया यांनी त्यांचा बाजार समितीच्या सभागृहात सत्कार केला. यावेळी बाजार समितीचे संचालक अण्णासाहेब खंदारे, प्रल्हादराव बोराडे, संतोष वरकड, दिलीप चव्हाण, महादेव बाहेकर, तुळशीराम कोहीरे, भागवत बाहेकर, बंडू मोरे, पप्पू दायमा यांची उपस्थिती होती. श्री जेथलिया यांनी ए जे बोराडे यांचा सत्कार करून भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## बीड जिल्ह्यातील ५ हजार ६०८ प्रकरणे राष्ट्रीय लोकअदालतमध्ये निकाली

बीड ।प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण यांच्या निर्देशावरून आनंद एल. यावलकर प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा अध्यक्ष जिल्हा विधी सेवा प्राधिकरण बीड यांच्या मार्गदर्शनाखाली शनिवार दि. २२ मार्च २०२५ रोजी पार पडलेल्या लोक न्यायालयात बीड जिल्हयातुन एकून ५६०८ प्रकरणे तडजोडीने निकाली निघाली आहेत.



बीड जिल्हयातून न्यायालयातील प्रलंबीत प्रकरणांपैकी एकूण ११९२४ प्रकरणे ठेवण्यात आली होती. यामध्ये दिवाणी, फौजदारी, मोटार अपघात, भुसंपादनाची प्रकरणे, १३८ एन.आय.ॲक्टच्या प्रकरणांचा समावेश होता. त्यापैकी ६९३ प्रकरणे निकाली निघाली आहेत. तर दाखलपुर्व प्रकरणामध्ये एकूण ४४४८४ प्रकरणे ठेवण्यात आली होती. त्यापैकी ४९१५ प्रकरणे निकाली निघाली आहेत. असे एकूण ५६०८ प्रकरणे निकाली निघाली आहेत. यामध्ये १७ कोटी ३३ लाख ३३ हजार १५६ एवढ्या रकमेची प्रकरणे निकाली निघाली आहेत.सदरील लोक न्यायालयाच्या प्रसंगी जी. जी. सोनी सदस्य सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण बीड यांच्यासह, व्ही.एच.पाटवदकर साहेब, जिल्हा न्यायाधीश -२, श्रीमती एस.आर.शिंदे जिल्हा न्यायाधीश,३, के. आर. जोगळेकर, जिल्हा न्यायाधीश ४ तसेच इतर पॅनल प्रमुख, बीड जिल्हा वकील संघाचे अध्यक्ष आर.डी.येवले यांच्यासह वकील संघाचे सर्व पदाधिकारी जिल्हा सरकारी वकील व सर्व सरकारी अभियोक्ता यांची लोकन्यायालयात प्रमुख उपस्थिती होती.न्यायालयीन अधिकारी, कर्मचारी, विधी महाविद्यालयाचे विद्यार्थी, बँक कर्मचारी, पोलीस कर्मचारी व इतर कार्यालयीन कर्मचारी यांनी लोकअदालत यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.

## रोहिलागड केंद्रांतर्गत १४ परीक्षा केंद्रावर केंद्रप्रमुख श्रीमंत गंगावणे यांच्या मार्गदर्शनाखाली १४७ असाक्षर परीक्षार्थींनी दिली नवभारत साक्षरतेची परीक्षा

रोहिलागड ।प्रतिनिधी

रोहिलागड केंद्रांतर्गत जिल्हा परिषद व खाजगी सह सर्व माध्यमाच्या सर्व व्यवस्थापनाच्या केंद्रांतर्गत १४ शाळांमध्ये भारत सरकार शिक्षण मंत्रालय द्वारे निर्धारित केलेल्या उद्दिष्ट प्रमाणे व रोहिलागड केंद्राचे केंद्रप्रमुख राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त श्रीमंत गंगावणे यांच्या मार्गदर्शनाखाली नव भारत साक्षरता मिशन अंतर्गत १००% असाक्षर परीक्षार्थी ची उल्लास पवर नोंदणी करून स्वयंसेवक नियुक्ती करून १०० टक्के म्हणजे १४७ पैकी १४७ असाक्षर परीक्षार्थींनी दिनांक २३ मार्च २०२५ रोजी दहा ते पाच या वेळेत शांतते व सुरळीत परीक्षा दिली.परिक्षा केंद्र रोहिलागड येथे २६ किनगाव येथे ८ चिकनगाव येथे ४० देशगव्हाण १० बाहेर भायगाव २० किनगाव वाडी१० कौचलवाडी १० निहालसिंगवाडी तर १३ जोगेश्वर वाडी १० असाक्षर परिक्षार्थींनी परीक्षा दिली यामध्ये सर्वाधिक १२२ असाक्षर स्त्रियांचा समावेश होता तर असाक्षर पुरुष संख्या २५ होती तसेच या असाक्षर संख्येमध्ये अनुसूचित जातीचे ३१ अनुसूचित जमातीचे २ व इतर संवर्गातील १११ असाक्षर परीक्षार्थींचा समावेश होताकेंद्र संचालक म्हणून कोकडे जरावंडे अवघड चांगले पठाडे जमादार शेळके बागुल गीते व गांगे तर त्यांना सहाय्यक पर्यवेक्षक म्हणून तांगडे खामगळ भवर भोसले मगरे सरवदे आग्रे बनसोड शिरसाट वाघमारे यांनी काम पाहिले परीक्षा शांतते व सुरळीत यशस्वीतेसाठी रोहिलागड केंद्राचे केंद्रप्रमुख राष्ट्रीय पुरस्कार श्रीमंत गंगावणे यांनी परिश्रम घेतले परीक्षा दिली तेव्हा असाक्षर परीक्षार्थींच्या चेहऱ्यावर आनंद ओसांडुन वाहत होता बाल वयात गेल्याचे असाक्षर परीक्षार्थी भासत होते






बीड – बार्शी नाका चौकामध्ये केसेस करताना एक्टिवा गाडीवर सिंधी घेऊन जाणारा गाडीसह पकडला. ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत , अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, डी वाय एस पी विश्वंभर गोल्डे व पेठ बीड पोलीस निरीक्षक अशोक ए ,पी ,आय सुदाम यांच्या मार्गदर्शनाखाली मो व क केसेस करत असताना ही कारवाई केली. या कारवाईत पोलीस हवालदार नसीर, अल्ताफ,अजय,शिंदे,माने यांनी धाडसाने कारवाई केली.

## सर्व पत्रकारांना सोबत घेवून काम करणार– गजानन मुडेगावकर

अंबाजोगाई(प्रतिनिधी)

अंबाजोगाई तालुका मराठी पत्रकार परिषदेचे माजी तालुकाध्यक्ष गजानन मुडेगावकर यांची नुकतीच बीड जिल्हा कार्याध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आल्याबद्दल अंबाजोगाई तालुका डीजीटल मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने आज बाळशास्त्री जांभेकर पत्रकार कक्षात सत्कार करण्यात आला.या सत्कार समारंभात बोलताना गजानन मुडेगावकर यांनी म्हटले की,माझी निवड मराठी पत्रकार परिषदेचे विश्वस्त एस.एम.देशमुख यांच्या आदेशावरून तसेच डिजीटल मिडीयाचे प्रदेशाध्यक्ष अनिल वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली बीड जिल्हा कार्याध्यक्ष पदी निवड करण्यात आली.माझ्यावर देण्यात आलेली जबाबदारी मी उत्तमरित्या पार पाडणार आहे.अंबाजोगाई तालुका डिजीटल मिडीयाच्या सर्व सदस्यांना सोबत घेवून काम करणार आहे.मराठी पत्रकार परिषद संबंधित सर्व पत्रकार सदस्यांना विश्वासात घेवून कार्य करताना समान वागणूक देण्यात येईल. फेरनिवड झालेले बीड जिल्हाध्यक्ष सोळंके यांच्या मार्गदर्शनाखाली विविध कार्यक्रमाचे आयोजन करून पत्रकारांच्या अडी अडचणी सोडवण्यास तत्पर राहील.अशी ग्वाही त्यांनी यावेळी दिली.प्रास्ताविक भाषणात डिजीटल मिडीयाचे मार्गदर्शक सतीश मोरे यांनी गजानन मुडेगावकर यांची बीड कार्याध्यक्ष झाल्याबद्दल शुभेच्छा देत म्हटले की,येथून पुढे प्रिंट मिडिया व डीजीटल मिडीया भावंडाप्रमाणे कार्य करीत राहतील.तर डिजीटल मिडीयाचे तालुकाध्यक्ष अभिजीत लोमटे यांनी सुध्दा आपले विचार मांडतांना म्हटले की, मराठी पत्रकार परिषदेच्या विश्वस्तांनी गजानन मुडेगावकर यांच्या खांद्यावर संपूर्ण जिल्ह्याची धुरा दिली ती उत्तमरित्या सांभाळतील यात कसलीही शंका नाही.निश्चितच सर्व पत्रकारांना सोबत घेवून काम करतील असा विश्वासही व्यक्त केला.



यावेळी राहुल देशपांडे,बालाजी खैरमोडे,मारोती जोगदंड, शेखमुशीर बाबा,व्यंकटेश जोशी,संजय जोगदंड, योगेश डाके,कांबळे,दादा सय्यद नईम, अहमद पठाण बालाजी देशमुख,आरेफ सिद्दिकी,सह प्रिंट व डीजीटल मिडीयाचे सर्व सदस्य उपस्थित होते.

## रंगनाथराव देशपांडे यांचे निधन

डॉ आशिष तिवारी/मंठा

दुधा (ता. मंठा) येथील विविध कार्यकारी विकास सोसायटीचे माजी चेअरमन रंगनाथराव शेषराव देशपांडे यांचे रविवार दि. २३ मार्च रोजी सकाळी ११ वाजता दीर्घ आजाराने निधन झाले.



मृत्यूसमयी त्यांचे वय ७४ वर्ष होते. त्यांच्या पश्चात पत्नी, रवींद्र आणि वैभव ही दोन मुले, एक मुलगी, सुना-नातवंडे, २ भाऊ, १ बहीण असा परिवार आहे. पत्रकार रुक्मिणीकांत दीक्षित यांचे ते सासरे होते. त्यांच्या पार्थिवावर सायंकाळी ६ वाजता दुधा येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

## छोटा कमांडो पर्सण्यालिटी डेव्हलपमेंट प्ले ग्रुप उपक्रमाचा शालेय विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा ले. कर्नल डॉ.मधुकर कांबळे



अंबाजोगाई ।प्रतिनिधी

कल्याणम् एज्यूकेअर पुणे तर्फे समर कॅम्प मध्ये छोटा कमांडो पर्सण्यालिटी डेव्हलपमेंट प्ले ग्रुप चे आयोजन करण्यात आले असून त्याचा शालेय विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा असे आवाहन ले. कर्नल डॉ.मधुकर कांबळे यांनी केले आहे.याबाबत सविस्तर वृत्त असे की विद्यार्थ्यांना बदलत्या शैक्षणिक सामाजिक परीस्थितीत स्पर्धेच्या काळात सक्षम बनवण्यासाठी सदरील उपक्रमाची सुरुवात केली आहे. या कार्यक्रमासाठी ले.कर्नल डॉ.मधुकर कांबळे यांच्या सह कॉम्प्युटर वर्ल्ड चे संचालक श्री.संतोष मोहिते सर, शिवसेना तालुका प्रमुख श्री ऋषी लोमटे श्री बादाडे सर, श्री कुलकर्णी सर कल्याणम् चे डायरेक्टर अँड.कल्याण नेहरकर, रामकृष्ण नेहरकर,हर्षवर्धन नेहरकर यांची उपस्थिती होती या उपक्रमात अंबाजोगाई परिसरातील भारतीय सैनिक सेवेत दाखल झालेले तोहित शेख, ओम धोत्रे, गणेश घुगे, निकेश गायकवाड या यशस्वी झालेल्या यांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला

असून मण्यावरांच्या मार्गदर्शन नंतर छोटा कमांडो गणेश जाधव यांच्याकडून आभार मानून अंबाजोगाई येथील तालुका क्रीडासंकुल, मैदानावर या उपक्रमास सुरूवात झाली असून या उपक्रमात सहभागी होण्यासाठी कल्याणम् एज्यूकेअर यांच्या ९८२२२८८३८६ या क्रमांकावर संपर्क साधावा आवाहन करण्यात येत आहे.



## सैन्यदलात निवडीबद्दल गावकऱ्यांनी केला हृदय सत्कार

### मोहा गावचे दोन भूमिपुत्र देशसेवेत दाखल

परळी / प्रतिनिधी

परळी तालुक्यातील मोहा गावाचे सुपुत्र बंडू कांबळे आणि अभिषेक कांबळे यांची भारतीय सैन्य दलामध्ये निवड झाल्याने संपूर्ण गावात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून या यशस्वी निवडीबद्दल मोहा गावकऱ्यांच्या वतीने त्यांचे उत्स्फूर्त स्वागत व सत्कार करण्यात आला.

गावातील महाराष्ट्र विद्यालय येथील विद्यार्थी असलेले गावातील तरुणांसाठी प्रेरणादायी ठरलेल्या बंडू कांबळे व अभिषेक कांबळे यांनी कठोर परिश्रम आणि जिद्दीच्या जोरावर भारतीय लष्करात स्थान मिळवले. त्यांच्या या यशामुळे संपूर्ण गावाचा अभिमान वाढला असून, ग्रामस्थांनी त्यांच्या सत्कार समारंभ आयोजित करून कौतुकाची थाप देत त्यांचा हा प्रवास गावातील इतर युवकांसाठी प्रेरणादायी ठरेल, असे मत अनेकांनी व्यक्त केले. या सत्कार सोहळ्या कार्यक्रमासाठी मोहा व वंजारवाडी परिसरातील सुदाम शिंदे, दत्ता कांबळे, वैजनाथ पाळवदे, प्रवीण देशमुख, विष्णू देशमुख, विश्वंभर वाघमारे, रमेश बुरांडे, विशाल देशमुख, इस्माईल शेख, कमलदास चाटे, केरबा दादा पाळवदे, संदीपान शेरकर,

## दूरसंचार सल्लागार समितीची बैठक संपन्न

# सेवांसंबंधी महत्त्वपूर्ण निर्णय



जालना ।प्रतिनिधी

जालना, औरंगाबाद आणि बुलढाणा जिल्ह्यांची दूरसंचार सल्लागार समिती बैठक पार पडली. या बैठकीत BSNL च्या सेवांबाबत विविध विषयांवर सखोल चर्चा करण्यात आली. इडछछ नेटवर्कची सद्यस्थिती, टॉवर उभारणी, टेंडर प्रक्रियेत झालेल्या त्रुटी आणि नॅशनल ऑप्टिकल फायबर नेटवर्क योजनेअंतर्गत झालेल्या कामांची पडताळणी यावर भर देण्यात आला.

बैठकीत मागील TAC मिटिंगफेब्रुवारी २०२४ च्या इतिवृत्ताची प्रत मागविण्यात आली, तसेच BSNL च्या कामकाजात आलेल्या अडचणींवर चर्चा झाली. ठेकेदाराने औरंगाबाद, जालना आणि बुलढाणा येथे तात्पुरत्या स्वरूपात केलेल्या कामांसाठी EPF, ESIC आणि इतर कायदेशीर बाबींची पूर्तता न केल्यामुळे ने बील थांबविले होते. परंतु नियमांचे उल्लंघन करत गुत्तेदारास चुकीच्या पद्धतीने बीले अदा करण्यांत आले. या संदर्भात तीन दिवसांत संपूर्ण अहवाल सादर करण्याचे निर्देश खा.डॉ.कल्याण काळे यांनी दिले. तसेच, औरंगाबाद बीए अंतर्गत OFC टाकणे व दुरुस्तीवरील खर्चाची तपासणी करण्यास सांगण्यात आले. मागील तीन वर्षांत लॉसी फायबर, रिहॅबिलिटेशन आणि नवीन केबल टाकण्यासाठी मोठ्या प्रमाणावर खर्च करण्यात आला. जालन्यात NOFN प्रकल्पांतर्गत १३९ कोटी रुपये खर्च झाले, परंतु प्रत्यक्षात ही सेवा कार्यरत नाही. सध्या देखभाल आणि दुरुस्तीच्या नावाखाली फक्त बिलिंग केली जात आहे. बैठकीत BSNL च्या नॅशनल ऑप्टिकल फायबर नेटवर्क योजनेवर सुद्धा चर्चा झाली. हा प्रकल्प देशातील २,५०,००० ग्रामपंचायतींना फायबर नेटवर्कने जोडण्यासाठी तयार करण्यात आला होता. तसेच १ एप्रिल २०२३ पासून मेंटेनन्ससाठी ५ कोटी रुपये खर्च करण्यात आले. मात्र, सध्या नेटवर्क कार्यरत नाही, त्यामुळे हा खर्च अनुत्पादक ठरला आहे.

या संदर्भात खालील प्रश्न उपस्थित करण्यात आले –

जालना जिल्ह्यात BSNL अंतर्गत किती ग्रामपंचायती जोडल्या गेल्या? त्यापैकी किती ग्रामपंचायतींमध्ये सध्या नेटवर्क सुरू आहे?या संपूर्ण प्रकल्पासाठी झालेला एकूण खर्च किती?१ एप्रिल २०२३ पासून आजपर्यंत देखभाल–दुरुस्तीवर झालेला खर्च आणि त्याचा उपयोग काय? बैठकीत हा विषय गंभीर मानला गेला आणि BSNL अधिकाऱ्यांना तातडीने अहवाल सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

### महत्त्वाचे निर्णय आणि कृती योजना...

BSNL टॉवर अखंडित सुरू राहावे यासाठी खासदार मंत्री महोदयांकडे विनंती करणार आहेत. जालना, औरंगाबाद व बुलडाणासाठी नविन टॉवरला मान्यता मिळालेली आहे. सदरहू टॉवरचे लवकरच काम सुरू होणार.सरकारी कार्यालयांमध्ये BSNL कनेक्शन अनिवार्य करण्यासाठी राज्य सरकारकडे पत्रव्यवहार – सरकारी कार्यालयांमध्येBSNL कनेक्शन सक्तीचे करण्यासाठी पुढाकार घेतला जाणार.BSNL च्या विविध योजनांचा आढावा – ग्राहकांसाठी नवीन योजना आणि त्यांच्या अंमलबजावणीवर चर्चा करण्यात आली.या बैठकीत BSNL सेवांच्या बळकटीसाठी महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. यामुळे नेटवर्क सुधारणे, ग्रामपंचायतींमध्ये BSNL प्रभावीपणे कार्यान्वित करणे.




## मानवी जीवनात झाडांची महत्वाची भूमिका

### एका व्यक्तीने किमान एक झाड लावून ते जोपासावे – रेखा दुनगहू

बदनापूर ।प्रतिनिधी

पर्यावरण रक्षण संवर्धनाचे महत्व समजून घेऊन प्रत्येक व्यक्तीने येत्या पावसाळ्यात किमान एक झाड लाऊन संगोपन करावे व तसा संकल्प करावा असे आवाहन बदनापूर वन परिमंडळ अधिकारी श्रीमती आर.डी.दुनगहू यांनी केले. जागतिक वन दिनानिमित्त (ता.२१) तालुक्यातील धोपटेश्वर येथील मैनामाई माध्यमिक विद्यालयात वृक्षरोपण कार्यक्रम घेऊन विविध जातींचे वृक्ष लागवड करण्यात आले या वेळी त्या बोलत होत्या.दुनगहू पुढे म्हणाल्या,आपण सर्वांनी एक तरी झाड लावले पाहिजे. झाडे आपल्या जीवनासाठी खूप आवश्यक आहेत, ते आपल्याला शुद्ध हवा, पाणी आणि अन्न पुरवतात, तसेच पर्यावरणाची राखण करतात. मानवी जीवनात वनांचे महत्व समजावून सांगत त्यांनी पर्यावरण संवर्धनाबाबत माहिती देत विद्यार्थ्यांशी संवादही साधला. सहाय्यक वनसंरक्षक एस.एन. मुंडे, व वनपरिक्षेत्र अधिकारी के.डी.नागरगोजे यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आलेल्या या कार्यक्रमात वनरक्षक सुदाम राठोड, सचिन शिनगारे, महादेव कळमकर,वनमजूर गणेश म्हस्के तसेच शाळेचे मुख्याध्यापक बनकर सर, शिक्षक शेजवळ सर, साबळे सर, वायफट सर, चव्हाण सर,यांच्यासह विद्यालयातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## लेखी आश्वासनानंतर रोषणगांवचे उपसरपंच कृष्णा खरात सरपंच यांचे आमरण उपोषण मागे



जालना ।प्रतिनिधी

बदनापूर तालुक्यातील मौजे रोशनगाव येथील ग्रामपंचायतचे काळजीवाहू उपसरपंच कृष्णा एकनाथ खरात,अनिस बाबूलाल पठाण यांनी गावातील यशवंत घरकुल योजना, प्रधानमंत्री आवास योजना, शबरी आवास योजना,अहिल्याबाई होळकर घरकुल योजना,रमाई आवास योजना,यशवंतराव चव्हाण घरकुल योजना व जलजीवन मिशन अंतर्गतचे गावातील कामे इत्यादी नागरिकांच्या विविध प्रश्नासाठी पंचायत समिती कार्यालय बदनापूर येथे आमरण उपोषण सुरु केले असून जोपर्यंत कामे पूर्ण होत नाही तोपर्यंत उपोषण मागे घेतले जाणार नाही असा आक्रमक पवित्रा सरपंच आणि उपसरपंच यांनी घेतला होता. उपोषणाच्या चौथ्या दिवशी लेखी हमी दिल्यानंतर उपोषण मागे घेण्यात आले.

गावातील घरकुल योजनेच्या लाभार्थ्यांचे सर्व कागदपत्रे जमा करूनही त्यांच्या खात्यावर घरकुलाची रक्कम टाकली जात नाही, गावात जल जीवन मिशन योजनेचे झालेले अपुर्ण काम तसेच बंद अवस्थेत आहे.गावातील माता भगिनी यांना पाण्यासाठी वणवण फिरावे लागत असून पाण्याचा मोठा बिकट प्रश्न निर्माण झाला आहे. या कामाच्या संदर्भात वरिष्ठांशी पाठपुरवठा करूनही कामे होत नाही. आम्हा उपोषण कर्त्यास जिल्हा परिषद पाणीपुरवठा इंजिनियर जालना यांनी लेखी पत्र देऊन ९० टक्के काम पूर्ण झाले असून दहा टक्के काम दोन ते चार दिवसात केले जाईल अशा आश्वासन दिले आहे.रोषणगांवचे उपसरपंच कृष्णा भाऊ खरात व सरपंच चे चिरंजीव अनिस बाबुलाल पठाण यांचे पंचायत समिती कार्यालय बदनापूर समोर सुरू असलेले आमरण उपोषणाला गटविकास अधिकारी व जल जीवन जिल्हा परिषद पाणी पुरवठा इंजिनिअर जालना यांचे लेखी आश्वासनानंतर चौथ्या दिवशी मागे घेण्यात आले.

## अहिल्यादेवी होळकर त्रिशताब्दी वर्षानिमित्त बदनापूर

### येथे मुलींसाठी शिवकालीन युद्धकला प्रशिक्षण शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद



बदनापूर ।प्रतिनिधी

राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी वर्षानिमित्त देवगिरी प्रतिष्ठान, बदनापूरच्या वतीने मुलींसाठी विशेष शिवकालीन युद्धकला प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिराला मुलींसह पालक व नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. संस्थेचे अध्यक्ष भगवानराव मात्रे, सचिव डॉ. रामेश्वर पाटील, तसेच श्री. बद्रीनाथ औटे, बद्रीनारायण आरसुळ, ड. बालाजी वाघ, सिद्धेश्वर शेळके, भागवत पवार, रवी दाभाडे, गणेश जराड, सुदाम मात्रे यांच्या संकल्पनेतून हे शिबिर भव्य स्वरूपात सुरू झाले आहे.

गुरुकुलम शिशुवाटिका, बदनापूर येथे आयोजित बारा दिवसीय या शिबिराचे मार्गदर्शन प्रख्यात प्रशिक्षक शरद पाटील करीत आहेत. लाठीकाठी, तलवारबाजी, दांडपट्टा, दंडसाखळी, कराटे यांसारख्या शिवकालीन युद्धकला प्रकारांचे प्रशिक्षण या शिबिरात दिले जात आहे. एकूण ६० मुली या शिबिरात सहभाग घेत आहेत.

अहिल्यादेवी होळकर यांनी आपल्या शौर्याने, न्यायप्रियतेने आणि सामाजिक कार्याने एक आदर्श निर्माण केला. त्यांच्या त्रिशताब्दी वर्षानिमित्ताने आयोजित या शिबिराच्या माध्यमातून मुलींना आत्मसंरक्षणाची कला आत्मसात करण्याची संधी मिळत आहे. तसेच, त्यांच्यात आत्मविश्वास आणि धैर्य वाढीस लागेल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला आहे.या ऐतिहासिक आणि प्रेरणादायी उपक्रमाला परिसरातील नागरिक, पालक व विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून भरभरून प्रतिसाद दिला आहे.

तर मुलींच्या सुरक्षेबद्दल चिंता करण्याची गरज राहणार नाही – प्रा डॉ रामेश्वर पाटील

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, माँसाहेब जिजाऊ किंवा झाशीच्या राणी लक्ष्मीबाई या आजकालच्या मुलींच्या आदर्श असल्या पाहिजेत. हाच उद्देश डोळ्यासमोर ठेवून देवगिरी प्रतिष्ठानच्या सर्व सदस्यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रीशताब्दी जन्म वर्षाबद्दल बदनापूर येथे मुलींसाठी शिवकालीन प्रशिक्षण शिबिराचे आयोजन केले आणि त्याला बदनापूर व परिसरातील पालकांनी उदंड प्रतिसाद दिला. अशा प्रकारची प्रशिक्षण समाजातील सर्व मुलींना देण्यात आली तर मुलींच्या सुरक्षेबद्दल चिंता करण्याची गरज राहणार नाही असे मत प्रा डॉ रामेश्वर पाटील, अभाविप शहर अध्यक्ष बदनापूर यांनी व्यक्त केले.

## पवनचक्की कंपन्यांनी शेतकऱ्यांना मावेजापोटी दिलेले धनादेश वठलेच नाहीत

### बीड तालुक्यातील मुळुकवाडी येथील प्रकार,जिल्हा प्रशासनाची भूमिका म्हणजे कुंपनच शेत खातंय – डॉ.गणेश ढवळे



लिंबागणेश ।प्रतिनिधी

बीड तालुक्यातील मुळुकवाडी येथील रिन्यु ग्रीन पवनचक्की कंपनीने शेतकऱ्यांना मावेजा पोटी दिलेले धनादेश वठले नसल्याने व विचारणा केल्यानंतर आधिकारी उडवाउडवीची उत्तरे देत टाळाटाळ करत असल्याने शेतकऱ्यांनी तिव्र नाराजी व्यक्त केली आहे.

बीड तालुक्यातील बालाघाटावरील पवनचक्की कंपन्यांचा मनमानी कारभार सुरूच असुन जिल्हा प्रशासन आणि पोलीस प्रशासनाची भूमिका शेतकऱ्यांना न्याय भुमिकेतुन संरक्षण देण्याऐवजी पवनचक्की कंपन्यांची पाठराखण करण्याची असुन कुंपनच शेत खात असेल तर दाद कोणाकडे मागायची अशी संतप्त प्रतिक्रिया सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी व्यक्त केली आहे.

महिनाभरापूर्वी आमच्या शेतातील ज्वारीच्या उभ्या पिकातुन सहमतीशिवाय पवनचक्की प्रकल्प उभारण्यासाठी पोकलेन, जेसीबी,पिक अप अशा विविध वाहनांची वाहतूक केली. तेव्हा तुम्हाला नुकसान भरपाई देण्यात येईल असे सांगितले. परंतु पवनचक्की प्रकल्प उभारल्यानंतर अद्याप नुकसान भरपाई दिलीच नाही.जवळपास ८०० कडबा आणि ज्वारीची कणसे धुळीमुळे खराब झाली आहेत. अगोदर दिवसातुन ४-५ वेळा मनधरणी करण्यासाठी येणारे अधिकारी आता फोन सुद्धा उचलत नाहीत.या प्रकरणी ऊद्या सोमवारी जिल्हाधिकारी बीड व पोलीस अधीक्षक बीड यांना लेखी तक्रार करणार असल्याचे संदिप ढास यांनी सांगितले.

महाराष्ट्र शासनाच्या उद्योग ऊर्जा आणि कामगार विभागाने दि.२१ आक्टोबर २०२३ रोजी पवन ऊर्जा प्रकल्प जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय संनियंत्रण समित्यांची स्थापना केली असुन पवन ऊर्जा प्रकल्पाशी निगडित असलेल्या जमिनीच्या व्यवहाराबाबत कायदेशीर बाबी व अनिश्चितता तपासणे, जमिनीच्या व्यवहारांमध्ये योग्य व्यावहारिक मोबदला मिळत असल्याबाबत खात्री करणे.पवन ऊर्जा प्रकल्पाबाबत समितीकडे आलेल्या तक्रारींची चौकशी करून त्यावर योग्य कारवाई करणे.शेतकरी आणि ग्रामस्थ आणि प्रकल्प विकासक यांच्यामध्ये समन्वय ठेवणे आदि त्यांची कामे असुन जिल्हाधिकारी समितीचे अध्यक्ष तर पोलिस अधीक्षक सदस्य आहेत.मात्र या समित्या केवळ कागदावर कार्यरत असुन जिल्हाधिकारी आणि पोलिस अधीक्षक केवळ पवनचक्की कंपन्यांचीच पाठराखण करत असुन पिडीत शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडले असुन जिल्हा प्रशासनाची भूमिका कुंपनच शेत खातंय अशी झाल्याची संतप्त प्रतिक्रिया सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे यांनी व्यक्त केली आहे.

## तिरुपती सुपर स्पेशलिटी हॉस्पिटलचे अस्थिरोग आणि मनका विकार शिबिर संपन्न

बीड ।प्रतिनिधी

बीड शहरामध्ये नव्याने सुरू झालेले तिरुपती सुपर स्पेशलिटी हॉस्पिटल येथील,बीड जिल्ह्यातील सुप्रसिद्ध अस्थिरोग तज्ञ तथा मनका विकार विशेषज्ञ डॉ बालाजी नवले यांच्या सहकार्याने आणि उमापूर येथील डॉ नंदकुमार भोसले यांच्या भोसले हॉस्पिटलच्या संयुक्त विद्यमाने उमापूर आठवडी बाजार येथे गावखेडे,तांडे,वाडी,वस्तीवरच्या रुग्णांसाठी अस्थिरोग आणि मनका विकाराचे मोफत आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते या शिबिरामध्ये उमापूर येथील तसेच जवळपासच्या खेडेगावातील रुग्णांनी आपल्या विकाराचे निरसन करण्यासाठी.. गर्दी केली होती या शिबिरामध्ये रुग्णांची मोफत तपासणी तसेच रुग्णांच्या हाडाचे कॅल्शियम तसेच रक्त तपासणी ही मोफत करण्यात आली. शिबिरामध्ये पाठ दुखी कंबर दुखी गुडघेदुखी सतत अंगदुखी संधिवात हाडाचे इतर दुखणे तसेच मणक्याचे विकार यासंबंधी तपासणी आणि मार्गदर्शन करण्यात आले या शिबिरामध्ये



तिरुपती सुपर स्पेशलिटी हॉस्पिटलआणि उमापूर येथील डॉ नंदकुमार भोसले यांच्या भोसले हॉस्पिटलने सहकार्य करून रुग्णांची तपासणी व मार्गदर्शन केले या शिबिरामध्ये शेकडो रुग्णांनी शिबिराचा लाभ घेतला..! तिरुपती सुपर स्पेशलिटी हॉस्पिटल आणि मनका विकार तज्ञ डॉ बालाजी नवले यांनी या शिबिराबरोबरच रुग्णांना फ्रॅक्चर,अस्थिरोग मणक्याच्या आजाराचे निदान व उपचारासाठी बीड येथील हॉस्पिटल ला भेट देण्याचे आवाहन करून संपर्कासाठी ७७७०००३२२९ ,८६६८२१२३३१ या दूरध्वनीवर संपर्क करण्याचे आवाहन केले आहे.

## महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोगाचे उपाध्यक्ष व सचिव ॲड.धर्मपाल मेश्राम यांनी घेतली शिरूर व जामगाव येथील पीडित कुटूंबाची भेट



### शिरूर येथील वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी केलेली कारवाई आक्षेपार्ह – ॲड.धर्मपाल मेश्राम

बीड ।प्रतिनिधी

शिरूर कासार येथील वनविभागाने कारवाई केलेल्या पारधी कुटुंबीयांना मदत करणे बाबत व त्याची चौकशी करण्याबाबत प्रशासनाच्या स्तरावर योग्य ती कार्यवाही झालेली नाही असे निदर्शनास आले आहे. याठिकाणी वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी जी कार्यवाही केली ती आक्षेपार्ह आहे असेही निदर्शनास आले आहे. याबाबत अनुसूचित जाती जमाती आयोग चौकशी करेल अशी माहिती आयोगाचे उपाध्यक्ष व सचिव ड .धर्मपाल मेश्राम यांनी प्रत्यक्ष भेटी नंतर दैनिक समर्थ राजयोगला सांगताना दिली. त्यानंतर त्यांनी आष्टी येथील जामगाव येथे भेट देऊन पीडितांची बाजू ऐकून घेत आयोग तुमच्यावर अन्याय होवू देणार नाही असा विश्वास दिला.

शिरूर कासार येथील आदिवासी पारधी समाजाच्या वस्तीवर वनविभागाच्या अधिकाऱ्यामार्फत झालेल्या जाळपोळीच्या अनुषंगाने त्यांनी घटनास्थळाची भेट आणि पहाणी केली. तर आष्टी तालुक्यातील जामगाव येथील मातंग कुटुंब असणाऱ्या कर्त्या पुरुषाची हत्या पैशाच्या हेतूने दोन जणांनी केली. त्यात एक अल्पवयीन आहे. याही बाबतीत येत्या पंधरा दिवसात सामाजिक न्याय विभागाने कार्यवाही करावी अशा सूचना त्यांनी या कुटुंबाची भेट घेतल्यानंतर प्रशासनाला दिल्या. सदर कुटुंबातील कर्ता पुरुष व्यक्ती गेल्यामुळे त्याच्या मुलांना शासनातर्फे नोकरी दिली जावी असेही आयोग प्रस्तावित करेल असे मेश्राम म्हणाले. आज या दोन्ही ठिकाणी मेश्राम यांनी भेट दिली. यावेळी त्यांच्या समवेत सामाजिक न्याय उपयुक्त पोलीस विभाग व आदिवासी विभागाचे अधिकारी, बीडचे जिल्हा माहिती अधिकारी प्रशांत दैठणकर आदींची प्रमुख उपस्थिती होती.

# राज्य शासनाचे सर्वोत्तम काम हीच मोठी आश्वासक बाब : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## पायाभूत सुविधा विकासासाठी बँकाकडून सर्वोत्तम सहकार्य

मुंबई ।प्रतिनिधी

महाराष्ट्र प्रगतीशिल राज्य असून राज्यातील पायाभूत सुविधा प्रकल्प पूर्ण करण्यासाठी सर्व बँकाचे सहकार्य नेहमीच मिळत आले आहे.राज्यातील रस्त्यांची गरज लक्षात घेवून रस्ते विकासासाठी नियोजन करण्यावर भर देण्यात येत आहे.समृध्दी महामार्गाच्या यशस्वी कामामुळे आज अनेक बँका राज्यातील पायाभूत सुविधा प्रकल्पांना कर्ज देण्यासाठी पुढे येत आहेत.राज्य शासनाचे सर्वोत्तम काम हीच सर्वात मोठी आश्वासक बाब आहे.महाराष्ट्र शासन म्हणजेच बँकासाठी आश्वासक असून बँकाकडून राज्य शासनाला यापुढे असेच सर्वोत्तम सहकार्य मिळेल अशी आशा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केली.

विधानभवन येथे महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळ (एमएसआयडीसी) आढावा बैठक मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती.या बैठकीला सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ.पी.गुप्ता,मुख्यमंत्री कार्यालयाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे,सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अपर मुख्य सचिव मनीषा म्हैसकर,प्रधानसचिव अश्विनी भिडे, सचिव रस्ते सदाशिव साळुंखे,महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक पदावर ब्रिजेश दीक्षित, हुडकोचे व्यवस्थापकीय संचालक संजय कुलक्षेत्र, आय. आय. एफ. सी. एल. (इंडियन इन्फ्रास्ट्रक्चर फायनान्स कॉर्पोरेशन लिमिटेड) चे मुख्य प्रबंधक राजकुमार राल्हण,कॅनरा बँकेचे महाप्रबंधक अलोक कुमार अग्र वाल, पंजाब नॅशनल बँकेचे जनरल मॅनेजर एस राजगुरू, नको बँकेचे कार्यकारी संचालक नितीन बोडके, बँक ऑफ महाराष्ट्राचे जनरल मॅनेजर अमित कुमार शर्मा, नाफेड चे उपाध्यक्ष हर्षल महावरकर, पंजाब अँड सिंध बँकेचे मुख्य महाप्रबंधक विनोद कुमार पांडे, एस. बी. आय. कॅपिटल लिमिटेडचे वरिष्ठ उपाध्यक्ष असित रंजन सिकंदर विविध बँकाचे अधिकारी उपस्थित होते.




मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळामार्फत सर्व बँकाच्या सहकार्याने राज्यात २५ कोटी ८७५ कोटींचे अर्थसहाय्य प्राप्त झाले आहे अत्यंत चांगली बाब आहे.राज्यातील पायाभूत सुविधांसाठी या वर्षी सार्वजनिक बांधकाम विभागाची राज्यात १ लाख कोटी रूपयांची कामे पूर्ण होतील हे सांगताना मला आनंद होत आहे.रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक सूचनांचा अवलंब करूनच राज्य विविध बँकाकडून नियमित कर्ज घेवून त्याची परतफेड करत असते. राज्यातील रस्ते चांगल्या दर्जाचे होण्यासाठी राज्य शासन कोणाच्याही शिफारशीशिवाय प्रत्यक्ष रस्त्यांची गरज कोणत्या भागात आहे हे लक्षात घेवून रस्ते विकासासाठी नियोजन करून उत्तम दर्जाचे रस्ते देण्यासाठी प्रयत्नशील आहे.सर्व बँकानी राज्यातील पायाभूत सुविधांसाठी राज्य शासन करत असलेले नियोजन व अंमलबजावणी याची माहिती जरूर घ्यावी अशा सूचना त्यांनी यावेळी केल्या.

राज्यातील पायाभूत सुविधा बळकटीकरणावर भर : शिवेंद्रराजे भोसले

सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले म्हणाले,महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळामार्फत विविध रस्त्यांची कामे सुरू आहेत. सुधारित हॅम पहिल्या टप्प्यातील कामे प्रगतीपथावर आहेत.माननीय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा महत्वकांक्षी शंभर दिवसाच्या कार्यक्रमामध्ये एमएसआयडीसी मार्फत ३४ जिल्ह्यात जवळजवळ ५९७० किमी लांबीचे रस्ते सुरू करण्याचे प्रस्तावित होते ते सर्व कामे झाली आहेत उद्दीष्टापेक्षा जास्त कामे सुरू केली असून केले असून ते लवकर पूर्ण करण्यात येतील असेही ते म्हणाले.

महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक ब्रिजेश दीक्षित म्हणाले की.शंभर दिवसाच्या कार्यक्रमामध्ये पुणे ते शिरूर उडाणपूल काम,तळेगाव- चाकण - शिक्रापूर हायवे,हडपसर यवत हायवे या कामांना आवश्यक असलेली मंत्रीमडळाची मान्यता घेवून नॅशनल हायवेची कामे गतीने पूर्ण करण्यात येतील असे त्यांनी सांगितले.



## बीड तालुक्यात पाण्यासाठी उपाय योजना करा – शिवसंग्राम

बीड ।प्रतिनिधी

वाढत्या उन्हाने आता ग्रामी टीव्हीण भागात पाण्याची समस्या जाणवत आहे. पाण्याची भूजल पातळी झपाट्याने खालावत चालली आहे. त्यामुळे सांडपाण्या सह पिण्याच्या पाण्याची समस्या निर्माण होत असून या करिता प्रशासनाने उपाययोजन कराव्यात यासाठी आज बीड तालुका शिवसंग्रामच्या वतीने निवेदन देण्यात आले.

बीड तालुक्यातील अनेक गावात सध्या पाण्याची टंचाई भासत आहे. भूजलातील पाण्याची पातळी झपाट्याने कमी होत आहे.तर गावातील विहिरी ही तळ गाठत आहेत. अश्यात ग्रामीण भागात पाण्याची समस्या निर्माण होत आहे. तसेच सध्या ऊसतोडणीस गेलेले मजुर गावी परतत आहेत त्यामुळे गावोगावी पाण्याची गरज वाढली आहे.त्यामुळे बऱ्याच गावात सध्या पिण्याच्या पाण्यासाठी लोकांना भटकंती करावी लागत आहे.त्यामुळे तालुक्यातील सर्व गावांचा सर्व्हे करून ज्या बोअर / विहिरिला पाणी आहे त्या अधिग्रहण करावेत आणि ज्या ठिकाणी बोअर विहिरिला पाणी नाही त्या ठिकाणी तात्काळ पाण्याचे टँकर उपलब्ध करावेत असे शिवसंग्रामच्या वतीने देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे. या प्रसंगी शिवसंग्राम तालुका अध्यक्ष पंडित माने, युवक जिल्हाध्यक्ष सुनील कुटे, खरेदी विक्री संघाचे संचालक गोपीनाथ घुमरे, राजेंद्र आमटे,राजेंद्र माने,नामदेव धांडे, शेषेराव तांबे,गणेश साबळे ,मुकुंद गोरे ,मंगेश माने, दादा गोंदवले, विलास शिंदे , मस्के आदी . उपस्थित होते.



## डॉ. सुदाम मुंडे रोड ते जिजामाता उद्यान रोडवरील खड्डे बुजवा – अँड.मनोज संकाये

परळी / प्रतिनिधी

परळी शहरातील जास्त रहदारी असलेल्या आणि मोंढा मार्केट रोडला जोडणारा डॉ. सुदाम मुंडे रोड ते जिजामाता उद्यान रोडवर खड्डेच खड्डे पडले आहेत त्यामुळे नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे मात्र नगरपालिकेचे याकडे लक्ष नाही. पालिकेचे मुख्याधिकारी साहेबांनी या कामाकडे लक्ष देऊन त्वरित या मार्गावरील खड्डे बुजवावीत आणि नागरिकांची होणारी गैरसोय टाळावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते अँड.मनोज संकाये यांनी परळी नगरपालिकेचे मुख्याधिकारी श्री त्रंबक कांबळे यांच्याकडे केली आहे. डॉ. सुदाम मुंडे रोडवर आठवडी बाजार दर सोमवारी भरतो. या बाजारासाठी तालुक्यातून शेतकरी मोठ्या प्रमाणावर आपली उत्पादने भाजीपाला घेऊन येतात. लोकांची गर्दी खरेदीसाठी आठवडी बाजारामध्ये याच मार्गावर असते मात्र याच मार्गावर असंख्य खड्डे पडली आहेत त्यामुळे वाहनांना अडथळे निर्माण होतात. वृद्ध माणसांना खड्ड्यांमुळे व्यवस्थित चालता येत नाही अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. हाच मार्ग जिजामाता उद्यानाकडे जातो त्याची सुद्धा परिस्थिती अशीच आहे त्यामुळे नगरपालिकेचे दक्ष मुख्याधिकारी यांनी तात्काळ लक्ष देऊन या मार्गावरील खड्डे बुजवावेत

## पैठण येथे झाला देवभक्त कथामृत ग्रंथाचा प्रकाशन सोहळा

बीड / प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील वारकरी संप्रदायाचे जेष्ठ कीर्तनकार प,पू आचार्य अमृताश्रम स्वामी महाराज (अमृत महाराज जोशी) यांची वंश परंपरेतील पूर्वाचार्यांचे चरित्र प्रतिपादन करणारा देवभक्तकथामृत ग्रंथाचा प्रकाशन सोहळा फाल्गुन कृ ७ दि २१-०३-२५ रोजी श्रीक्षेत्र पैठण येथे संपन्न.शुभहस्ते व ह.भ.प.श्री. रावसाहेबमहाराज गोसावी यांच्या अध्यक्षतेत व प.पू.श्री.प्रसादमहाराज अमळनेरकर, उपस्थित :- प.पू.श्री.मोहननाथ महाराज



पैठणकर,ह.भ.प.श्री.कान्होबामहाराज देहूकर, ह.भ.प.श्री.राणामहाराज वासकर, ह.भ.प.श्री.महंत शिवाजीमहाराज नारायणगडकर, ह.भ.प.श्री.ज्ञानेश्वर महाराज जळगांवकर, ह.भ.प.श्री.प्रमोदमहाराज जगताप, ह.भ.प.श्री.माधवदासमहाराज राठी, ह.भ.प.श्री.उदबोध महाराज, ह.भ.प.श्री.पुष्करमहाराज गोसावी, ह.भ.प.श्री.योगेशमहाराज पालखीवाले, ह.भ.प.श्री.महंत संभाजीमहाराज, ह.भ.प.श्री.अक्षयमहाराज भोसले, ह.भ.प.श्री.विठ्ठलमहाराज चवरे, ह.भ.प.श्री.रामकृष्णमहाराज वीर, ह.भ.प.श्री.राम महाराज झिंजुरके, ह.भ.प.श्री.जयदेव महाराज पितळे, ह.भ.प.श्री.अक्षय महाराज पिंगळे, ह.भ.प.श्री.महेंद्र मामा कुलकर्णी, ह.भ.प.श्री.प्रसाद देव महाराज चासकर,ह.भ.प.श्री.किरण म भाले ,स्वामी मधुरानंद,विठ्ठल.म.बहिर,ह.भ.प रामेश्वरमुंदडा,डॉ.मकरंद शास्त्री (ग्रंथ प्रकाशक) व समस्त भाविकांच्या उपस्थितीत कार्यक्रम अत्यंत थाटात संपन्न झाला.



दक्षिण काशी श्री क्षेत्र पैठण येथे शांतीब्रह्म श्री संत एकनाथ महाराज षष्ठी उत्सवात संत बंकटस्वामी महाराज फडावर काल्याचे कीर्तन करताना मठाधिपती महंत गुरुवर्य श्री ह भ प लक्ष्मण महाराज मेंगडे बाबा व उपस्थीत हजारो भाविक भक्त.

# शांतता भंग करणाऱ्या दंगलखोरांविरुद्ध कडक कारवाई करा- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

मुंबई / प्रतिनिधी

नागपूर हे धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक शहर म्हणून ओळखले जाते. या शहराची वेगळी संस्कृती आहे. कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होईल, अशा प्रकारच्या घटना बरेच वर्षानंतर पहिल्यांदाच घडली आहे. भविष्यात अशा प्रकारच्या घटना घडणार नाही यादृष्टीने शांतता भंग करणाऱ्या दंगलखोरांविरुद्ध अत्यंत कठोर कारवाई करा, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज दिलेत.

नागपूर शहरातील कायदा व सुव्यवस्थेसंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वरिष्ठ पोलीस अधिकारी, जिल्हाधिकारी, महानगरपालिका आयुक्त तसेच वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांसोबत शहरात घडलेल्या घटनेसंदर्भात आढावा घेतला. त्यानंतर मार्गदर्शन करताना ते बोलत होते.पोलीस आयुक्तालयाच्या सभागृहात आयोजित बैठकीस राज्याचे महसूलमंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, पोलीस आयुक्त डॉ.रविंद्र सिंगल, नागपूर परिक्षेत्राचे पोलीस महानिरीक्षक दिलीप पाटील-



भुजबळ, जिल्हाधिकारी डॉ.विपीन इटनकर, महानगरपालिका आयुक्त डॉ. अभिजित चौधरी, सहपोलीस आयुक्त निसार कांबळी, अतिरिक्त पोलीस आयुक्त संजय पाटील, प्रमोद शेवाळे, शिवाजी राठोड, पोलीस अधीक्षक हर्ष पोद्दार, पोलीस उपायुक्त लोहीत मतानी, राहुल मदने, महेक स्वामी, विशेष शाखेचा पोलीस उपायुक्त श्वेता खेडकर, अश्विनी पाटील आदी उपस्थित होते.शांतताप्रिय शहर म्हणून नागपूरची ओळख आहे. या शहराला अशांत करणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचे सांगताना मुख्यमंत्री श्री.फडणवीस म्हणाले की, औरंगजेबासंदर्भात दुपारी आंदोलन करणाऱ्यांविरुद्ध पोलीसांनी कारवाई केल्यानंतरही समाजकटंकांकडून सायंकाळी दंगा भडकविण्यात आला. दंगलखोरांना नियंत्रणात आणण्यासाठी पोलीस विभागाने तत्काळ कारवाई करुन दंगल आटोक्यात आणली. परंतु या दंगलीमध्ये मोठ्या प्रमाणात वाहनांची जाळपोळ व संपत्तीचे नुकसान झाले आहे. पोलिसांवरही दगडफेक केल्यामुळे ३४ पोलीस जखमी झाले आहेत. अशा प्रकारच्या घटना शहराच्या कुठल्याही भागात घडणार नाही यादृष्टीने पोलीस विभागाने सतर्क राहून कठोर कारवाई करावी, असे निर्देश यावेळी दिले.शहराच्या अकरा पोलीस स्टेशनच्या परिसरात जमावबंदी आदेश लागू करण्यात आले आहे. या संदर्भात १३ गुन्हे दाखल झाले असून १०४ आरोपींना अटक करण्यात आली आहे. त्यापैकी १२ विधी संघर्ष बालक आहेत. शहरातील सीसीटीव्ही कॅमेरे तसेच जनतेकडून प्राप्त झालेल्या कव्हरेज (व्हिडीओ क्लीप) च्या आधारे दंगलखोरांना शोधून त्यांच्याविरुद्ध कडक कारवाईचा सूचना देण्यात आल्या असून एकही दंगलखोर यामधून सुटणार नाही, अशी सूचना करताना मुख्यमंत्री म्हणाले की, दंगल भडकविण्यासाठी कारणीभूत ठरलेल्या विविध समाज माध्यमांवरील पोस्टची तपासणी करुन अशा प्रकारच्या २५० पोस्ट शोधण्यात आल्या आहेत. या पोस्ट टाकणाऱ्या ६२ लोकांविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे. तर दोन लोकांना अटक करण्यात आली आहे. अशा पोस्ट टाकणारे व शेअर करणाऱ्यांविरुद्ध दंगल भडकविल्याबद्दल सहआरोपी करण्याचे निर्देश यावेळी मुख्यमंत्र्यांनी दिले.

दंगलीमध्ये ७१ वाहनांचे तसेच विविध मालमत्तेचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. नुकसानी संदर्भात जिल्हा प्रशासनाने पंचनामे सुरु केले आहे. वाहनांच्या नुकसानी संदर्भात विमा कंपन्यांना आवश्यक असलेले दस्ताऐवज उपलब्ध करुन देण्यासबंधी तत्काळ कारवाई करावी, अशी सूचना यावेळी केली.

## संचारबंदी टप्प्याटप्प्याने हटवणार

### झालेल्या नुकसानीची दंगलखोरांकडून भरपाई

दंगलीमध्ये मालमत्तेचे तसेच वाहनांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहेत. नुकसानीसंदर्भात पंचनामे करुन येत्या तीन ते चार दिवसात नुकसान भरपाई देण्याच्या सूचना करताना मुख्यमंत्री म्हणाले की, संपूर्ण नुकसानीची भरपाई दंगलखोरांकडून करण्यात येईल. नुकसान भरपाई करताना दंगलखोरांच्या मालमत्तेची विक्री करुन संपूर्ण भरपाई वसूल करण्यात येईल. यासाठी महानगरपालिका, जिल्हा प्रशासन व पोलीस विभागातर्फे संयुक्त कारवाई करण्याचे निर्देश यावेळी दिले.

# गुजरातमधून महाराष्ट्रात गुटख्याची तस्करी

## अनेक नेत्यांचा सहभाग;वडेट्टीवारांच्या आरोपांमुळे खळबळ

गुजरातमधून महाराष्ट्रात गुटख्याची तस्करी होत असल्याचा गंभीर आरोप विजय वडेट्टीवारांनी केला आहे. या गुटखा तस्करीत अनेक नेत्यांचा हात असल्याचंही ते म्हणाले आहेत. एकतर गुजरातमधून येणरा गुटखा बंद करा किंवा महाराष्ट्रातील गुटखाबंदी हटवा अशी मागणी त्यांनी केली आहे. त्यांच्या या मागणीवर भाजप नेते अमित साटम यांनी आक्षेप घेतला आहे. गुजरातमधून महाराष्ट्रात गुटखा तस्करीचा आरोप गुटखा तस्करीत नेत्यांच्या सहभागाचा विरोधकांचा दावा कारवाई करा नाहीतर बंदी उठवण्यासाठी मागणी राज्यातल्या कोणत्याही गावात जा किंवा कोणत्याही शहरात जा.... पानटप-या आणि दुकानांमधून गुटख्याची सर्रास विक्री होत असल्याचं दिसत आहे. महाराष्ट्रात गुटखाबंदी आहे तरीही खुलेआम गुटखाविक्री होत असल्याचं चित्र आहे. काँग्रेस आमदार विजय वडेट्टीवार यांनी राज्यात सर्रास गुटखाविक्री होत असल्याचा आरोप केला आहे. यात काही राजकीय नेत्यांचाही गुटखाविक्रीच्या रॅकेटमध्ये सहभाग असल्याचं वडेट्टीवार यांचं म्हणणं आहे. महाराष्ट्रात गुजरातमधून गुटखा विक्रीसाठी येत असल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

गुजरात मार्गे कॅन्सर महाराष्ट्रात!




आज महाराष्ट्र विधानसभेत मी राज्यात मोठ्या प्रमाणावर होणाऱ्या बेकायदेशीर गुटखा विक्रीचा मुद्दा उचलला. हा संपूर्ण गुटखा गुजरातमधून महाराष्ट्रात येतो आणि आपल्या तरुण पिढीचे आरोग्य धोक्यात घालतो.

महाराष्ट्रात गुटखा बंदी असतानाही हा व्यवसाय कसा

गुटखाबंदी उठवा अन्यथा गुटखा विकणा-यावर कठोर कारवाई करा या वडेट्टीवारांच्या मागणीवर सत्ताधा-यांनी तीव्र आक्षेप घेतला आहे. गुटखाबंदी उठवण्याची मागणी करणं म्हणजे गुटखा लॉबीला मदत केल्यासारखं असल्याचा आरोप भाजप आमदार अमित साटम यांनी केला आहे.

गुटख्याचं व्यसन हा विषय गंभीर आहे. गुटख्यावर बंदी आहे. पण ती बंदी कागदावर असल्यासारखं चित्र आहे. लोकप्रतिनिधींनी गुटख्याच्या विषयावर आरोप प्रत्यारोप करण्यापेक्षा गुटखाबंदी कठोरपणे राबवण्यासाठी प्रशासकीय पातळीवर पाठपुरावा करण्याची गरज निर्माण झाली आहे.

# कर्नाटकात मुस्लिमांना ४ टक्के आरक्षण

## जोरदार गदारोळात विधानसभेत मंजूर झाले विधेयक

हनी ट्रॅप घोटाळ्याच्या पार्श्वभूमीवर कर्नाटक विधानसभेत सरकारी कंत्राटांमध्ये मुस्लिमांना ४ टक्के आरक्षण देणारे विधेयक मंजूर करण्यात आले. भाजपने या विधेयकाला घटनाबाह्य म्हणत विरोध केला असून सभागृहात गोंधळ घातला आहे.कर्नाटकात मुस्लिमांना ४ टक्के आरक्षण जोरदार गदारोळात विधानसभेत मंजूर झाले विधेयक

कर्नाटक विधानसभेत मुस्लीमांना सरकारी कंत्राटात मुस्लींना चार टक्के आरक्षण देणारे विधेयक जोरदार गदारोळात मंजूर झाले आहे. भाजपाने या विधेयकास विरोध करीत त्यास घटनाबाह्य म्हणत विधानसभेत घोषणाबाजी करीत गोंधळ घातला. भाजपाने काँग्रेसवर तुष्टीकरणाचा आरोप करीत या विधेयकाला आव्हान देण्याचा निर्णय घेतला आहे. तर काँग्रेसने यास सामाजिक न्यायाचे पाऊल म्हटले आहे.कर्नाटक विधानसभेत सरकारी कंत्राटात मुस्लीमांना चार टक्के आरक्षण देणारे वादग्रस्त विधेयक मंजूर झाले आहे. हनी ट्रॅपवरुन गोंधळ सुरु असतानाच हे विधेयक मंजूर करण्यात आले आहे. भाजपाच्या आमदारांनी हनी ट्रॅप



घोटाळ्यावर चर्चा करण्याऐवजी या विधेयकाला मंजूरी दिल्याने सत्तारुढ काँग्रेस पक्षावर जोरदार टीका केली आहे.

मुस्लीमांना आरक्षण

गेल्या शुक्रवारी मंत्रीमंडळाने कर्नाटक सार्वजनिक खरेदीमध्ये पारदर्शकता (केटीपीपी) कायद्यात सुधारणांना मंजुरी दिली होती. ज्यामध्ये २ कोटी रुपयांपर्यंतच्या (सिव्हील काम) कामांच्या करारांमध्ये ४ टक्के आणि १ कोटी रुपयांपर्यंतच्या वस्तू/सेवा खरेदी करारांमध्ये मुस्लिमांसाठी राखीव ठेवण्यात आले. मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी ७ मार्च रोजी सादर केलेल्या २०२५-२६ च्या अर्थसंकल्पात मुस्लीमांना चार टक्के आरक्षणाची घोषणा केली होती.

### प्रचंड गदारोळात विधेयकाला मंजूरी


मुस्लीमांना सरकारी कंत्राटात चार टक्के आरक्षण देण्याच्या या विधेयकाला भाजपाने घटनाबाह्य म्हणत राज्यात घोटाळ्यांवर उत्तर देण्याऐवजी मुस्लींना कोटा विधेयक देऊन लांगुलचालन केल्याचा आरोप केला आहे. या विधेयकाला जशी मंजूरी मिळाली तशी भाजपाचे नेते नारेबाजी करीत विधानसभेत घुसले आणि स्पीकरच्या सीटवर चढून बसले. तसेच या विधेयकाच्या प्रती देखील फाडून टाकल्या. तसेच स्पीकरवर कागदाचे तुकडे फेकले.


सध्या कर्नाटकमध्ये एससी/एसटी (२४ टक्के ) आणि श्रेणी-१ (४ टक्के) आणि श्रेणी-२अ (१५ टक्के ) संबंधीत ओबीसी कंत्राटदारांसाठी सिव्हिल वर्क कॉन्ट्रॅक्टमध्ये आरक्षण आहे. मुस्लिमांना ओबीसींच्या श्रेणी-२ ब मध्ये चार टक्के आरक्षण देण्याची मागणी केली जात होती.

### विधेयकाला आव्हान देणार - भाजपा

हनी ट्रॅप घोटाळ्यावर चर्चा घडवून आणण्या ऐवजी मुख्यमंत्र्यांनी मुस्लीमांना चार टक्के आरक्षणाचे विधेयक मांडण्यात व्यस्त होते. त्यामुळे आम्ही याचा विरोध केला आहे. सत्ताधारी आमदारांनी कागद फाडून आमच्यावर टाकले. पुस्तके आमच्यावर फेकली आहेत. आम्ही कोणाला नुकसान पोहचवले नाही. भाजपा या विधेयकाला कायदेशीर आव्हान देण्याची तयारी करीत आहे असे भाजपाचे आमदार भरत शेट्टी यांनी म्हटले आहे.

# एकमेव यश हे हजारो प्रश्नांवर उत्तर ठरलं - खुशबू नरुका



बीड(प्रतिनिधी)

संघर्ष जिद्द चिकाटी संयम हे जेव्हा मिळून येतात तेव्हा यश हे लखलखत. हे फक्त आपल्याला वाचण्यातच पाहायला मिळत असते. पण याच जिवंत उदाहरण आज खुशबू नरूका यांनी राजस्थानलाच नव्हे तर भारत देशाला सुद्धा अनुभवायला मिळवून दिलं. प्राथमिक शिक्षण हे राजस्थानच्या शाळेमध्ये झाल्यानंतर खुशबू नरुका या २०२२ मध्ये दिल्ली येथे आल्या भारतामधली सर्वात अवघड समजली जाणारी यूपीएससी या परीक्षेतून जिल्हाधिकारी होण्यासाठी तीन वेळा प्रयत्न केले पण या प्रयत्नात त्यांना अपयश आलं. पण अखेर १९ मार्चला निकाल लागला आणि या डेप्युटी फील्ड ऑफिसर म्हणून यांची भारताच्या सेंट्रल सेक्रेटरी करून नियुक्ती झाली.

सण असो उत्सव असो कधीही आणि कितीही घरची आठवण आली तरीही आपली पदनियुक्तीच ही आपल्या परिवाराची सुखाची चावी आहे हे समजून कोणत्याही सण उत्सवाला न जाता खुशबू नका यांनी दिवस रात्र एक करून जिद्दीने तळमळीने अभ्यास केला.

अगर हम अदृश्य है, तो समझिये हम असरदार है

हे वाक्य त्यांनी खरं करून दाखवलं.

वय वर्ष फक्त २७ यात अनेक वेळा अपयश संघर्ष करावा लागला या अपयशातूनच समाजातील भिन्न विभिन्न विचारसरणी असणारे लोक यांचे टोमणे सुद्धा सहन करावे लागले पण आज तेच समाजातील लोक त्यांचा सत्कार करताना स्टेटस ठेवताना पाहायला मिळत आहेत. पण हा संघर्ष इथेच न थांबता अजूनही जिद्दीला पेटवून खुशबू नरूका तळमळीने यशाची गवसणी घालतील

सितारों के आगे जहाँ और भी है

राजस्थानच्या या लेकीने राजस्थानमध्येच नव्हे तर महाराष्ट्रात देखील आणि भारतामध्ये सुद्धा आपल्या कर्तुत्वाने सर्वांच्या माना उंचावले आहेत. या यशाबद्दल बीड शहरातील निवृत्त सहा पोलीस उपनिरीक्षक भागवत शिंदे यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

# अखेर सायमाला आधार कार्ड मिळाला

## पोस्टमास्तर विनोद गर्जे यांची शिष्टाई फळाला

पाटोदा (प्रतिनिधी)

सध्याच्या युगात एखाद्याचा आधार नंबर नसणे म्हणजे त्याच्या अस्तित्वावरच प्रश्न चिन्ह उभे राहते. असंच काहीसं गेल्या ९ वर्षांपासून उपचाराअभावी अपंगत्व आलेल्या सायमा सोबत घडलं होतं परंतु पाटोदा पोस्ट ऑफिसचे पोस्टमास्तर विनोद गर्जे यांची शिष्टाई फळाला आली. सायमाला आधार कार्ड नंबर मिळाला.



अनवधनाने घडलेल्या अपघातात गंभीर जखमी झालेल्या सायमाला योग्य उपचार न मिळाल्याने अंपगत्व आले. गेल्या ९ वर्षांपासून ती अंथरुणावर पडुन होती. ही गंभीर बाब जेव्हा सय्यद शफाओद्दीन, पत्रकार हमीदखान पठाण, जावेद शेख यांच्या निदर्शनास आल्यानंतर त्यांनी प्रसिद्धी माध्यमाद्वारे आर्थिक मदतीसाठी लोकसहभागाचे आवाहन केले होते. त्यामुळे अनेक दानशूरांनी स्वतःहुन पुढे येत सढळ हाताने मदत सुरू केली. ती अविरतपणे सुरू असुन त्यातुनच सायमावर उपचार सुरू आहेत. मात्र शासकीय पातळीवर तिचे अस्तित्व सिध्द करण्यासाठी महत्वपूर्ण मानले जाणारे आधार कार्ड नसल्याने मोठी अडचण येत होती. तिच्या कुटुंबियांनी अनेकदा आधार कार्ड काढण्याचा प्रयत्न केला होता मात्र अपयश येत होते. या गंभीर घटनेकडे पाटोदा पोस्ट ऑफिसचे पोस्टमास्तर विनोद गर्जे यांचे सय्यद शफाओद्दीन व पत्रकार हमीदखान पठाण, जावेद शेख यांनी लक्ष वेधले. त्यांनी आधार कार्ड का रिजेक्ट होते याची इत्यंभुत माहिती घेत आठ दिवस बीड, औरंगाबाद येथील वरिष्ठ अधिकाऱ्यांशी संवाद साधत सायमाचे अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी स्वतः जबाबदारी घेत नगरपंचायत, तहसील कार्यालय तसेच शाळेतील महत्त्वाची कागदपत्रांची जुळवाजुळव करून दि.२७ फेब्रुवारीला आधार कार्ड ऑनलाइन केले होते. या दरम्यान आधार कार्ड रिजेक्ट होऊ नये यासाठी वरिष्ठांशी वेळोवेळी पाठपुरावा केला. मात्र १२ दिवसाचा कालावधी लोटला तरी आधार कार्ड वेटींग मध्येच का आहे? याचा अंदाज येत नसल्याने औरंगाबाद येथील कार्यालयाचा वेळ मागुन घेत सायमालाच तिथे घेऊन जाण्याची योजना आखली। मात्र दि.१५ मार्च रोजी सायमाचा आधार कार्ड ऑनलाइन झाल्याचा मेसेज आला आणि सर्वांनी सुटेकेचा निश्वास सोडला. खऱ्या अर्थाने पोस्टमास्तर विनोद गर्जे यांचा पाठपुरावा व शिष्टाई फळाला आली. याच संदर्भात दि.१९ मार्च बुधवार रोजी पोस्ट ऑफिस कार्यालयाच्या वतीने सायमाला आधार कार्ड देण्यात आले. यावेळी सायमा व सय्यद शफाओद्दीन, पत्रकार जावेद शेख, हमीदखान पठाण, सचिन शिंदे आदींच्या वतीने पोस्टमास्तर विनोद गर्जे, काकडे, तावरे, सचिन कांबळे, प्रसाद मोराळे, कु.अंकिता सावंत, बेद्रे तथा इतर कार्यालयीन सहकाऱ्यांचा शाल, पुष्पहार, पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

### काम म्हणजे माझ्यासाठी पर्वणी, कायमच सेवा देण्याचा प्रयत्न - विनोद गर्जे

मी स्वतः पाटोदा तालुक्यातील महासांगवी गावचा असुन पाटोदा शहरातील तथा तालुक्यातील ग्राहकाचे काम म्हणजे माझ्यासाठी पर्वणी समजून कायमच सेवा देण्याचा प्रामाणिक प्रयत्न केलेला आहे आणि भविष्यातही करत राहणार.सायमा हिला काहीतरी मदत करू शकलो हे माझं भाग्य. ईश्वर, अल्लाहने त्यांना लवकर त्यांच्या पायावर उभं करावं अशी प्रार्थना करतो.

- विनोद गर्जे (पोस्टमास्तर, पाटोदा)

# राज्यातील नवरत्नांना लोकाशा भुषण पुरस्कार जाहीर


## शांतीलाल मुथ्था,सय्याजी शिंदे,राधेशाम चांडक,ओमप्रकाश शेटे,राहूल आवारे,निखीला म्हात्रे,भरत गिते,विलास बडे,मंगेश चिवटे यांचा होणार सन्मान,

बीड (प्रतिनिधी)

दैनिक लोकाशाच्या वर्धापन दिनानिमित्त दि.३१ मार्च ते २ एप्रिल दरम्यान लोकाशा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असून, लोकाशा महोत्सवाचा समारोप राज्याचे उपमुखमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना. अजितदादा पवार आणि पर्यावरण मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. दोन एप्रिलला दिमाखदार सोहळा पार पडणार आहे. याच सोहळ्यात राज्यातील नवरत्नांना लोकाशा भुषण पुरस्काराने सन्मानित केले जाणार आहे. त्याअनुषंगानेच शनिवारी दै. लोकाशाचे संपादक विजयराज बंब यांनी पत्रकार परिषद घेवून नऊ जणांना राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर केला आहे. दरम्यान या कार्यक्रमाला राज्यातील अनेक दिग्गज नेत्यांसह बीड जिल्ह्यातील खासदार, आमदार व सर्व लोकप्रतिनिधींची उपस्थिती राहणार आहे.

### २ एप्रिलला दिमाखदार सोहळा

दै. लोकाशाने आठरा वर्ष पुर्ण केले असून आता १९ व्या वर्षात लोकाशा पर्दापण करत आहे. याअनुषंगानेच यंदापासून लोकाशा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. हा महोत्सव सलग तीन दिवस चालणार आहे. याच महोत्सवाची माहिती देण्यासाठी शनिवारी संपादक विजयराज बंब यांनी लोकाशा कार्यालयात पत्रकार परिषद घेवून संवाद साधला. लोकाशा महोत्सवाची सुरुवात २०१० साली करण्यात आली होती. यावर्षी लोकाशाच्या १९ व्या वर्धापन दिनानिमित्त दि.३१ मार्च ते २ एप्रिल दरम्यान राज्यस्तरीय लोकाशा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. दि.३१ मार्च रोजी सायंकाळी ५ वाजता होम मिनिस्टर खेळ पैठणीचा हा क्रांतीनाना मळेगावकर यांचा कार्यक्रम होणार आहे. यामध्ये सहभागी होणार्या सर्व महिलांना भेटवस्तू देण्यात येणार आहेत. विशेष म्हणजे होम मिनीस्टर खेळ पैठणीचा या कार्यक्रमातील विजेत्या महिलांना प्रथम बक्षीस कुलर, द्वितीय बक्षीस सोन्याची नथ तर तृतीय बक्षीस आकर्षक पैठणी मिळणार आहे. महोत्सवाच्या दुसर्या दिवशी म्हणजेच दि.१ एप्रिल रोजी सायं.५ वाजता खुल्या व सोलो डान्स स्पर्धा होणार आहेत. खुल्या डान्स स्पर्धेतील स्पर्धकांना प्रथम बक्षीस ११००० रूपये, दितीय बक्षीस ५००० रूपये, तर तृतीय बक्षीस ३००० रूपये मिळणार आहे. सोलो डान्स स्पर्धा दोन गटात होणार असून, दोन्ही गटांना प्रत्येकी प्रथम बक्षीस ५००० रूपये, द्वितीय बक्षीस ३००० रूपये, तर तृतीय बक्षीस २००० रूपये देण्यात येणार असल्याचे यावेळी श्री. बंब यांनी सांगितले. तसेच विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणार्या नवरत्नांना लोकाशा भूषण पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे. प्रत्येकी एक लक्ष रुपये रोख, सन्मानपत्र, स्मृतीचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. सामजिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल शांतीलालजी मुथा, कला क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरीसाठी प्रसिध्द अभिनेते सयाजी शिंदे, सहकार क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल बुलढाणा अर्बनचे संस्थापक राधेशामजी चांडक, क्रिडा क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल प्रसिद्ध कुस्तीपटू राहूल आवारे, पत्रकारिता क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरीबद्दल टी.व्ही.-९ च्या अँकर निखीला म्हात्रे, आरोग्य क्षेत्रातील कामगिरीबद्दल ओमप्रकाश शेटे व मंगेश चिवटे, पत्रकारितेच्या क्षेत्रातील उत्कृष्ट कामगिरीबद्दल विलास बडे व उद्योग क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल भरत गित्ते यांना यावर्षीचा लोकाशा भूषण पुरस्कार जाहीर करण्यात आला असून, दि.२ एप्रिल रोजी सायं. ५ वाजता दैनिक लोकाशाच्या प्रांगणात दिमाखदार सोहळ्यात या पुरस्काराचे वितरण करण्यात येणार असल्याची माहिती यावेळी संपादक विजयराज बंब यांनी दिली आहे. या पत्रकार परिषदेला लोकाशा महोत्सव समितीच्या सदस्यांची उपस्थिती होती.



शांतीलालजी मुथ्था (सामाजिक) | सयाजी शिंदे (कला) | राधेश्यामजी चांडक (सहकार) | राहूल आवारे (क्रीडा) | निखिला म्हात्रे (अँकर टीव्ही ९ मराठी) | भरत गिते (उद्योग) | ओमप्रकाश शेटे (आरोग्य) | विलास बडे (पत्रकारिता) | मंगेश चिवटे (जनसेवा)

### एक लक्ष रुपये रोख,सन्मानपत्र,स्मृतीचिन्ह देऊन होणार गौरव, लोकाशा महोत्सवासाठी अजित पवार,पंकजा मुंडेंची राहणार प्रमुख उपस्थिती

### ७५ वर्षे पूर्ण केलेल्या दाम्पत्यांचा आणि आदर्श कुटुंबांचाही होणार सन्मान

ज्या दांम्पत्यांचे वय ७५ वर्षापेक्षा अधिक आहे अशा दांम्पत्यांचा अमृत महोत्सवी सत्कार करण्यात येणार आहे, यशिवाय जे कुटुंब एकत्र राहतात अशा आदर्श कुटुंबांचाही यावेळी सत्कार करण्यात येणार असल्याचे श्री. बंब यांनी सांगितले.

### दरवर्षी लोकाशा महोत्सवात नवरत्नांना राज्यस्तरीय पुरस्कार देणार - विजयराज बंब

दरवर्षी लोकाशा महोत्सवाचे आयोजन केले जाणार आहे. त्यानुसार या महोत्सवात दरवर्षी नवरत्नांना राज्यस्तरीय पुरस्कार दिला जाणार आहे. या वर्षी लोकाशा महोत्सवात भव्य दिव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. तरी या सर्व कार्यक्रमास बीड शहर व जिल्ह्यातील जनतेने मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन संपादक विजयराज बंब व लोकाशा महोत्सव समितीने केले आहे.